cmyk

संपादकीय

दुर्दैवाने गुन्ह्याचे माहेरघर होवू नये!

विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाणारे पुणे आता गुन्ह्यांचे, गुन्हेगारांचे माहेरघर म्हणून ओळखले जाईल. 'पुणे तेथे काय उणे' असे मोठ्या अभिमानाने म्हटले जायचे आता 'पुणे तेथे गुन्हे' अशी नाचक्की होईल. असे होण्यामागे बुधवारी पुण्यातील स्वारगेट बस स्थानकात शिवशाही बसमध्ये एका २६ वर्षीय तरुणीवर सराईत गुन्हेगाराने केलेला बलात्कार कारणीभूत आहे. दिल्लीतील 'निर्भया' बलात्कार आणि हत्या प्रकरणाच्या स्मृती अद्यापही ताज्या असतानाच बुधवारी पहाटे स्वारगेट बस स्थानकात उभ्या असलेल्या 'शिवशाही' बसमध्ये एका तरुणीवर बलात्काराची धक्कादायक घटना उघडकीस आल्याने राज्यभर खळबळ उडाली आहे.

दैनिक
राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–३०७ | शनिवार, दि.०१ मार्च २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

राज्यात बंदी चोर बिटी बियाण्यांची विक्री

कृषी विभागाचे मात्र दुर्लक्ष

पुणे । प्रतिनिधी

मागील वर्षी अवकाळी पावसाने चांगलाच धुमाकूळ घातल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. हे दुःख विसरून आता शेतकरी बांधव येणाऱ्या खरिपाच्या मशागतीच्या कामाला लागला आहे. दरम्यान, शेतीच्या कामासाठी लागणाऱ्या बी–बियाण्यांची खरेदी करून आतापासूनच घरी जमा करत आहेत. मात्र, शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेत शासनाची बंदी असलेले चोर बिटी बियाण्यांची विक्री जोरात सुरू असून, याकडे कृषी विभागाचे दुर्लक्ष होत आहे.

चोर बिटी (बीजी–३) या कापसाच्या वाणाची लागवड केल्यास शेतजमीन नापीक होते. तसेच मानवाला कॅन्सर होण्याचा धोका संभावतो. त्यामुळे शासनाने या बियाण्यांवर बंदी घातली आहे. मात्र, तेलंगणातून चोरट्या मार्गाने सदर बियाणे महाराष्ट्रात आणली जात आहेत. कृषी विभाग मात्र कोणतीही कारवाई करीत नसल्याने या बियाण्यांची खुलेआम विक्री अनेक ठिकाणी विशेष करून विदर्भात सुरू आहे. दरवर्षी कापसाचा पेरा वाढत चालला आहे. कापसाच्या पिकात मोठ्या प्रमाणात गवत उगवत असल्याने गवत काढण्यावर शेतकऱ्यांना मोठा खर्च करावा लागतो.

◀◀ पान २ वर

अधिक उत्पादनाचे आमिष

यावर्षी कापसाच्या भावात घसरण झाल्याने शेतकरी कमालीचे हैराण झाले. त्यामुळे शेतकरी वर्ग कमी जागेत जास्त उत्पादन घेण्याच्या आमिषेपोटी प्रतिबंधित असलेल्या बियाण्यांच्या खरेदीला बळी पडत आहे. त्याचाच फायदा घेत नफाखोर व्यापारी तसेच दलाल घेताना दिसून येत आहेत. मात्र, याबाबत कृषी विभाग मात्र उदासीन असल्याचे दिसून येत आहे.

आरटीई प्रवेशासाठी १० मार्चपर्यंत मुदतवाढ

पुणे । प्रतिनिधी

शिक्षण हक्क कायद्यानुसार (आरटीई) खासगी शाळांमधील २५ टक्के राखीव जागांवर प्रवेशासाठी निवड झालेल्यांपैकी आतापर्यंत केवळ ४६.५७ टक्के बालकांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. या जागांवर बालकांच्या प्रवेशासाठी आणखी संधी मिळावी, म्हणून प्राथमिक शिक्षण विभागाने निवड यादीतील बालकांच्या प्रवेशासाठी आता मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे पालकांना निवड यादीतील बालकांचे प्रवेश १० मार्चपर्यंत निश्चित करता येणार आहेत.

प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९' नुसार (आरटीई) शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी केंद्रीय पद्धतीने ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्यानुसार राज्यातील आठ हजार ८६३ शाळांमधील एकूण एक लाख नऊ हजार ८७ रिक्त जागांसाठी तीन लाख पाच हजार १५२ अर्ज आले होते. त्यातील एक लाख एक हजार ९६७ बालकांची निवड यादी शिक्षण विभागाने जाहीर केली. आतापर्यंत निवड यादीतील केवळ

◀◀ पान २ वर

वाल्मिक कराडला जेलमध्ये व्हिआयपी ट्रिटमेंट?

देशमुख कुटुंबाचा आरोप; माहिती अधिकारात सिसिटिव्ही फुटेज मागवणार

एसआयटीकडे तक्रार करा–अजित पवार

जेलमध्ये कशी वागणुक दिली पाहिजे याबाबत नियम असून जर कोणाला यावर आक्षेप असेल तर एसआयटीकडे तक्रार करा. यात दोषी असलेल्यांना शासन केले जाईल, अशी प्रतिक्रीया पालकमंत्री अजित पवार यांनी दिली.

जेल प्रशासनाने अहवाल दिला?

जिल्हा कारागृहात वाल्मिक कराडला व्हिआयपी ट्रिटमेंट दिली जात असल्याचा आरोप झाल्यावर याबाबतचा अहवाल जेल प्रशासनाने संबंधितांना दिला असल्याचे समजते.

बीड । प्रतिनिधी

मकोका अंतर्गत जिल्हा कारागृहात असलेल्या वाल्मिक कराडला व्हिआयपी ट्रिटमेंट दिली जात आसल्याचा आरोप करीत त्याबाबत माहिती अधिकारात जेलमधील सर्व सिसिटिव्ही फुटेज मागवणार असल्याची माहिती देशमुख कुटुंबाने दिली आहे. देशमुखांच्या आरोपानंतर विजय वड्डेटीवार, अनिल देशमुख, जितेंद्र आव्हाड यांनी जेल प्रशासनावर जोरदार हल्लाबोल केला आहे.

संतोष देशमुख खून प्रकरणानंतर मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड यांना खंडणी प्रकरणी अटक केल्यावर त्यांच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे ते

◀◀ पान २ वर

देशमुख हत्येचा खटला केज कोर्टातच चालणार

संतोष देशमुख हत्या प्रकरण यापुढे केज कोर्टातच चालवावे लागणार आहे. एसआयटीने हे प्रकरण बीडमध्ये चालवण्याची परवानगी मागितली होती. मात्र सुरक्षेसाठी केवळ हे प्रकरण बीडमध्ये चालवण्यात आले. जर बीडच्या विशेष कोर्टात चालवायचे असेल तर तशी हायकोर्टाकडून परवानगी घेण्यासाठी बीड जिल्हा न्यायालयाने एसआयटीला कळवले आहे.

इष्टांक वाढीसंदर्भात धनंजय मुंडे यांनी घेतला जिल्हानिहाय आढावा

बुलढाणा जिल्ह्यातील केस गळतीबाबत ही घेतली सर्वंकष माहिती

मुंबई । प्रतिनिधी

राज्य विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवारपासून मुंबई येथे होणार असून या पार्श्वभूमीवर आज राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी मंत्रालयात विभागाचा जिल्हा निहाय आढावा घेतला.

अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनेतील विविध जिल्ह्यात इष्टांक वाढवणे, ई पॉस मशीन सह सर्व अन्य समस्या याबाबत प्रत्येक जिल्ह्याच्या पुरवठा अधिकारी व अन्य अधिकाऱ्यांकडून माहिती घेत धनंजय मुंडे यांनी संबंधितांना योग्य त्या सूचना केल्या. विविध जिल्ह्यांमधील लोकप्रतिनिधींनी मागणी केल्याप्रमाणे तसेच ज्या जिल्ह्याने इष्टांक पूर्ती केली आहे त्यांना वाढीव मागणी असल्यास इष्टांक देण्यासंदर्भात तसेच ईष्टाकाची पूर्ती न केलेल्या जिल्ह्यातील उर्वरित इष्टांक हा अन्य आवश्यकता असलेल्या ठिकाणी हस्तांतरित करण्याबाबत धनंजय मुंडे यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या. बुलढाणा जिल्ह्यात रेशनचे धान्य व त्यामुळे केस गळती होत असल्याबाबतच्या

◀◀ पान २ वर

पवार काकांची शॅडो कॅबिनेट, नेत्यांकडे विभागवार जबाबदारी

सरकारच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमावर लक्ष ठेवणार

मुंबई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून शॅडो कॅबिनेटची निर्मिती करण्यात आली असून त्या माध्यमातून राज्य सरकारच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमावर लक्ष ठेवण्यात येणार आहे. तसेच पक्षाच्या नेत्यांवर विभागवार जबाबदारी देण्यात आली असून त्या नेत्यांना महाराष्ट्र पिंजून काढण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाची मुंबईत बैठक पार पडली. त्यामध्ये पक्षाच्या संघटनात्मक बांधणीवर चर्चा करण्यात आली.

◀◀ पान २ वर

कोणाकडे कोणती जबाबदारी?

मराठवाडा– राजेश टोपे आणि जयप्रकाश दांडेगांवकर., विदर्भ– राजेंद्र शिंगणे आणि अनिल देशमुख. , कोकण– जितेंद्र आव्हाड आणि सुनिल भुसारा., प. महाराष्ट्र– हर्षवर्धन पाटील., उत्तर महाराष्ट्र– हर्षवर्धन पाटील.

युवक अध्यक्षपदी फहाद अहमद

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या युवक राष्ट्रीय अध्यक्षपदी फहाद अहमद यांची निवड करण्यात आली आहे. फहाद अहमद यांनी नुकतीच पक्षाकडून अणुशक्तीनगर विधानसभेची निवडणूक लढली होती. फहाद अहमद हे अभिनेत्री स्वरा भास्कर यांचे पती आहेत. त्यांची युवक राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याची माहिती पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून दिली.

प्राध्यापक भरतीचा मार्ग अखेर मोकळा

मुंबई : राज्यातील अकृषी विद्यापीठांमधील प्राध्यापकांच्या भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य सरकारने प्राध्यापक भरतीला मान्यता दिली आहे. त्यामुळे काही महिन्यांपासून रखडलेल्या भरती प्रक्रियेचा मार्ग मोकळा

◀◀ पान २ वर

दत्ता गाडेला १२ पर्यंत पोलिस कोठडी

पुणे । प्रतिनिधीर

पुण्याच्या स्वारगेट बलात्कार प्रकरणी आरोपी दत्तात्रय गाडेला अटक करण्यात आली असून त्याला पुणे कोर्टात हजर करण्यात आले. यावेळी दोन्ही बाजुची सुनावणी पार पडली व आरोपीला १२ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. दोघांमध्ये संमतीने शारीरिक संबंध असल्याचा दावा बचाव पक्षाच्या वतीने करण्यात आला आहे.

पिडीतेवर आरोपीने दोनवेळा बलात्कार केला. तसेच तिला आपण बसचा वाहक असल्याचे सांगीतले होते, अशी माहिती पोलिसांनी कोर्टात दिली असून १४ दिवसांची पोलिस कोठडीची मागणी करण्यात आली होती. तसेच आरोपीवर ६ गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

◀◀ पान २ वर

युती टिकवायची असेल तर तारतम्य ठेवून बोला

अजित पवारांचा नाव न घेता सुरेश धसांना टोला

मुंबई । प्रतिनिधी

जनतेने महायुतीला कौल दिला असून युती टिकवायची असेल तर तारतम्य ठेवून बोला, असा टोला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नाव न घेता आ. सुरेश धसांना लगावला. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाहून जनतेने घड्याळ आणि बाणाला सुध्दा मतदान केले असे वक्तव्य धसांनी काही दिवसापुर्वी केले होते. त्याचा अजितदादांनी चांगलाच समाचार घेतला.

आष्टीचे आ. सुरेश धस यांनी

◀◀ पान २ वर

शक्ती कायदा गुंडाळला जाण्याची शक्यता

मुंबई : शक्ती कायदा गुंडाळणार असल्याची माहिती मिळत आहे. महिलांवरील अत्याचाराला आळा घालण्यासाठीचा शक्ती कायदा येण्यापूर्वीच गुंडाळला जाण्याची सक्यता आहे. शक्ती विधेयक मागे घेण्यासंदर्भातील प्रस्ताव गृह विभागाच्या वतीने कॅबिनेट बैठकीत मांडला जाणार असल्याची माहिती– सूत्रांनी दिली आहे. शक्ती विधेयकावर राष्ट्रपतींनी स्वाक्षरी न करताच परत पाठवले असून हे विधेयक मंजूर करता येणार नसल्याचे केंद्रीय विधी व न्याय मंत्रालयाने राज्य सरकारला कळवले असल्याचे दिसते.

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२८ फेब्रुवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू: ३२८.५० क्विंटल			
	२,४६०	३,१०१	२,८९१
ज्वारी/हायब्रिड: २५९.५० क्विंटल			
	१,८५०	४,२६०	२,५९६
मका/लोकल:५.०० क्विंटल			
	२,२०१	२,२०१	२,२०१
तूर :३०.०० क्विंटल			
	६,९५०	७,२५०	७,०६८
उडीद : ७.५० क्विंटल			
	५,१००	५,१००	५,१००
बाजरी: २४.५० क्विंटल			
	२,४०१	३,१५२	२,८९३
मुग :४.५० क्विंटल			
	६,५०१	७,४५१	६,९७६
सोयाबीन: १११.५० क्विंटल			
	३,९००	४,०२१	३,९८८
हरभरा: ३७.५० क्विंटल			
	५,१५०	५,७००	५,२७९

तुहिन कांत पांडे सेबीचे नवे प्रमुख

नवी दिल्ली। वृतसंस्था

केंद्र सरकारने वित्त सचिव तुहिन कांत पांडे यांची सेबीचे ११ वे प्रमुख म्हणून नियुक्ती केली. पांडे ओडिशा–केडरचे भारतीय प्रशासकीय सेवा (आएएस) अधिकारी आहेत. त्यांची तात्काळ प्रभावाने नियुक्ती करण्यात आली असून पुढील तीन वर्ष त्यांचा कार्यकाळ असेल, असे केंद्र सरकारने नियुक्तीच्या आदेशात नमूद केले आहे.

◀◀ पान २ वर

हिमस्खलन झाल्याने ५७ जण बर्फात दबले

चमोली । वृत्तसंस्था

उत्तराखंडमध्ये शुक्रवारी एक मोठी घटना समोर आली आहे. उंच भागात बर्फवृष्टी होत असताना, चमोली जिल्ह्यातील भारत–चीन सीमा क्षेत्राजवळील माना कॅम्पजवळ मोठा हिमस्खलन झाले. हिमस्खलनात जवळपास ५७ मजूर गाडले

◀◀ पान २ वर

उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच उष्णतेने अंगाची लाहीलाही!

मार्च ते मे दरम्यान सूर्य आग ओकणार, हवामान विभागाने दिला इशारा

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात फेब्रुवारी महिन्यातच उष्णतेच्या असह्य झळा जाणवू लागल्याने यंदाचा उन्हाळ्यात तीव्र उष्णतेला समोर जावे लागण्याची भीती असताना भारतीय हवामान विभागाने या संदर्भात महत्वाची माहिती दिली आहे.

देशातील अधिकांश भागात मार्च ते मे दरम्यान सामान्यपेक्षा अधिक तापमान राहण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आली आहे. मार्च ते मे दरम्यान देशात उष्णतेच्या लाटेचे दिवस सामान्यपेक्षा अधिक राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला असून महाराष्ट्रात देखील यंदाच्या उन्हाळ्यात

◀◀ पान २ वर

हवामान विभागाचा अंदाज काय?

सध्या राज्यासह देशातील विविध भागांत तापमानाची पातळी दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि विदर्भ या भागांमध्ये उष्णतेचा प्रभाव अधिक तीव्र असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, शनिवारी मार्च महिना सुरु होणार आहे. दरम्यान, हवामान अभ्यासक कृष्णानंद होसाळीकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, मार्चच्या सुरुवातीच्या दिवसात राज्यातील अंतर्गत भागात २–३ अंशांनी तापमान वाढणार असल्याचे सांगण्यात आले.

cmyk

अग्रलेख

दुर्दैवाने गुन्ह्याचे माहेरघर होवू नये !

विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाणारे पुणे आता गुन्ह्यांचे, गुन्हेगारांचे माहेरघर म्हणून ओळखले जाईल. 'पुणे तेथे काय उणे' असे मोठ्या अभिमानाने म्हटले जायचे आता 'पुणे तेथे गुन्हे' अशी नाचक्की होईल. असे होण्यामागे बुधवारी पुण्यातील स्वारगेट बस स्थानकात शिवशाही बसमध्ये एका २६ वर्षीय तरुणीवर सराईत गुन्हेगाराने केलेला बलात्कार कारणीभूत आहे. दिल्लीतील 'निर्भया' बलात्कार आणि हत्या प्रकरणाच्या स्मृती अद्यापही ताज्या असतानाच बुधवारी पहाटे स्वारगेट बस स्थानकात उभ्या असलेल्या 'शिवशाही' बसमध्ये एका तरुणीवर बलात्काराची धक्कादायक घटना उघडकीस आल्याने राज्यभर खळबळ उडाली आहे. पीडित तरुणीने स्वारगेट पोलिसांना याबाबत माहिती दिल्यानंतर पोलिसांनी तातडीने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यामध्ये आरोपी कोण आहे ते स्पष्ट झाले. त्याला अटकही करण्यात आली असून त्यास पोलिस कोठडी मिळाली आहे. आता त्याच्याकडून या अत्याचाराची सविस्तर माहिती मिळेलच. मात्र यामुळे पुणे प्रचंड बदनाम होत आहे

ही घटना समोर आल्यानंतर बस स्थानक परिसरातील सुरक्षेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. महिलांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज यामुळे अधोरेखित झाली आहे. स्वारगेट बसस्थानकात तरुणीवर एकदा नव्हे तर दोनदा अत्याचार झाल्याचे स्पष्ट झाले आहे. ससून रुग्णालयाच्या वैद्यकीय अहवालातून ही बाब स्पष्ट झाली आहे. स्वारगेट बसस्थानकाच्या आवारात दिवाळीत प्रवाशांकडील ऐवज चोरून नेण्याच्या एकापाठोपाठ पाच ते सहा घटना घडल्या होत्या. एसटी स्थानकाच्या आवारात प्रवाशांच्या पिशवीतून दागिने तसेच मोबाईल चोरीच्या घटना घडतात. त्यासाठी स्थानकातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्या वाढवण्याची गरज आहे.

राज्याची सांस्कृतिक नगरी, सुधारणावादी चळवळीचे केंद्र, विद्येचे माहेरघर, ऐतिहासिक घटनांचे साक्षीदार अशा अनेक विशेषणांनी पुण्याची महती गायिली जायची पण गत दशकभरात या पुण्यनगरीने स्वत:चीच बदनामी करून घेण्याचा सपाटा लावला आहे की काय अशी शंका येते. देशाच्या दाही दिशांतून हजारो विद्यार्थी पुण्यात केवळ शिक्षणासाठी येतात. इथे असलेले गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे वातावरण हे विद्यार्थ्यांच्या भवितव्याला आकार देणारे ठरते अशी लोकांची अजूनही धारणा आहे. आता तर तंत्रज्ञानाने अशी काही भरारी मारली आहे की सर्व प्रकारच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाशी निगडीत अभ्यासक्रम पुण्यात शिकवले जातात. पुण्यातील शिक्षण संस्थांची संख्या सुमारे पाच पटींनी वाढली आहे. औद्योगीकरण अथवा माहिती तंत्रज्ञानाचे महत्त्वाचे केंद्र म्हणूनही पुण्याने आघाडी मारली आहे. हिंजेवाडी आणि आजूबाजूचा परिसर आयटी हब म्हणून ओळखला जातो आहे. पुण्याची लोकसंख्याही दुपटीने वाढली आहे. या वाढत्या लोकसंख्येचे तितकेच चित्रविचित्र परिणाम पुण्यात पहावयास मिळत आहेत. गत काही वर्षांत गुन्हेगारीचा आलेखही वाढला आहे. त्यामुळे पुण्याला लागू होणारी सारी विशेषणे मुळा-मुठात विसर्जित झाल्याचे चित्र दिसत आहे. कोयता गँग, तलवार गँग, ड्रग्जचा वाढता प्रसार, व्यभिचार, अत्याचार आणि भ्रष्टाचारातही पुणे अव्वलस्थानी आले आहे. 'पुणे तिथे काय उणे' असे मोठ्या अभिमानाने म्हटले जायचे पण आता 'पुणे तिथे गुन्हेच गुन्हे' असे शरमेने म्हणायची वेळ आली आहे.

स्वारगेट बस स्थानकात शिवशाही बसमध्ये मुलीवर झालेला बलात्कार ही पुण्यातल्या गुन्हेगारीची ताजी आवृत्ती म्हणावी लागेल. आता कायद्याचा धाक राहिलेला नाही असे खेदाने म्हणावे लागते. गुन्हेगारीला मिळणारे अभयच त्याला कारणीभूत आहे. गत वर्षभरात महिलांवरील अत्याचारांबाबत महाराष्ट्र ढवळून निघाला आहे.

बदलापूरमध्ये विद्यार्थिनीवर झालेल्या अत्याचाराच्या विरोधात जनतेचे उत्स्फूर्त आंदोलन, आरोपीबरोबर झालेल्या खऱ्या-खोट्या चकमकीतील त्याचा मृत्यू आदी घटना अजूनही ताज्या आहेत. त्यातील जनभावना दुर्लक्षित करता येत नाही. सरकारी स्तरावर जे काही कठोर कायदे अपेक्षित आहेत ते व्हायचे तेव्हा होतील परंतु समाजात असलेली या संदर्भातील चीड अधिक महत्त्वाची ठरते. महिला अत्याचाराविरोधात आंध्र प्रदेशमध्ये 'दिशा' विधेयक आणले गेले परंतु त्याला अजून कायद्याचे स्वरूप प्राप्त झालेले नाही. महिलांवर अत्याचार झाल्यानंतर पुढील वीस दिवसांत आरोपीला शिक्षा ठोठावण्याची तरतूद त्यात आहे. तसा कायदा महाराष्ट्रातही आणण्याची घोषणा झाली परंतु अजूनही त्या कायद्याचा विचार झालेला दिसत नाही. म्हणजेच महिलांवरील अत्याचाराला तातडीने आळा बसावा अशी इच्छाशक्तीच राज्यकर्त्यांमध्ये दिसत नाही. महिला सुरक्षिततेसाठी वेगवेगळे कायदे आहेत परंतु त्यांची भीतीच राहिलेली नाही. गुन्हेगारी किंवा विकृतीच्या प्रवृत्तींनी पुण्याला विळखा घातला आहे हेच स्वारगेटमधील अत्याचार प्रकरणावरून दिसून येत आहे.

जिल्हा वकील संघाचे अध्यक्षपदी ॲड.अनिरुद्ध घुले

जालना । प्रतिनिधी

जिल्हा वकील संघाचे अध्यक्षपदी ॲड.अनिरुद्? घुले ६३ मतांनी विजयी झाले तर उपाध्यक्षपदी ॲड.मारोती आटोळे १०५ मतांनी विजयी,सचिवपदी ॲड.अभिषेक सतकर ८७ मतांनी विजयी, सह सचिवपदी ॲड.विनोद चव्हाण ४६ मतांनी विजयी आज दिनांक २८/२/२५,शुक्रवार रोजी झालेल्या एकूण ६५७ मतदारांपैकी ६०५ मतदार यांनी जालना जिल्हा वकील संघाचे निवडणूकीत मतदान केले, यावेळी अध्यक्ष पदाचे उमेदवार ॲड.आनंद एन. झा यांना ३ मते,ॲड.महेन्द्र साळवे यांना १०६ मते,ॲड.महेश धन्नावत यांना २१५ मते,ॲड.अनिरुद्ध घुले पाटील यांना २७८ मते ,बाद मते ३, उपाध्यक्षपदासाठी ॲड.मारोती आटोळे यांना २९० मते,ॲड.भाग्यश्री कुलकर्णी यांना १८५ मते,ॲड.शेख वसिम रफिक यांना १२७ मते, बाद मते ३, सचिव पदासाठीचे उमेदवार ॲड.राजेंद्र सोळंके यांना २५८ मते,ॲड.अभिषेक सतकर यांना ३४५ मते,बाद मते २, सह सचिव पदासाठी ॲड.विनोद चव्हाण यांना २६२ मते,ॲड.विजय कदम यांना २१६ मते,ॲड.अमोल पांडव यांना १२५,बाद मते २,जिल्हा वकील संघाचे निवडणूक निर्वाचन अधिकारी म्हणून ॲड.प्रविणकुमार खेडवाल,ॲड.वैभव खरात, ॲड.विनोद कुलकर्णी,ॲड.शितल खांडेभराड,ॲड.अयाज सुभाणी यांनी काम पाहिले अशी माहिती प्रसिध्दी प्रमुख ॲड.अरविंद मुरमे यांनी दिली आहे

पोलिस अधिकारी राजकारण्यांना वैतागले

१०० पेक्षा अधिक पोलिस अधिकाऱ्यांनी केले अर्ज, आमचा जिल्हा बदला!

बीड। प्रतिनिधी

संतोष देशमुख हत्या प्रकरणाने गाजत असलेल्या बीड जिल्ह्यात ड्युटी नको रे बाबा असे म्हणत जिल्ह्यातील १०७ पोलीस अधिकाऱ्यांनी बदलीसाठी विनंती अर्ज केला आहे. त्यामुळे बीडच्या पोलिस दलात खळबळ उडाली असून नेमकं बीड जिल्ह्यात आहे तरी काय ज्यामुळे पोलीस अधिकारी ड्युटी करायचं नको म्हणत आहेत,असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तसचं उपमुख्यमंत्री अजित पवार पालकमंत्री असलेल्यां बीड जिल्ह्यात का नको? या अगोदर अनेक अधिकाऱ्यांची बीड जिल्ह्यासाठी पसंती होती. मात्र अचानकच बदलीसाठी विनंती अर्ज आल्याने चर्चा होत आहे. अजित पवार यांनी पालकमंत्री पदाची चुकीची गोष्ट खपवून घेतली जाणार नाही असा सज्जड दम आहे दिला होता.

संतोष देशमुख हत्या प्रकरण, लोकसभा विधानसभा निवडणुकीमुळे वाढलेला जातिवाद, त्यातून होणारे आरोप प्रत्यारोप यामुळे बीड जिल्हाच नको असे काही अधिकारी खासगीत नको म्हणत आहेत.

"आतापर्यंत किती अर्ज आले?

विशेष महानिरीक्षकाकडे यामधे बीड जिल्ह्यात एकूण २९ पोलीस ठाणे आहेत. या पैकी १५ ठाणेदारांचा बदलीसाठी अर्ज आहे तर पोलीस अधीक्षक कार्यालयअंतर्गत असलेल्या विशेष शाखेपैकी सहा जणांनाचा विनंती अर्ज आहे. या सर्व अधिकाऱ्यांच्या विनंती बदल्या मान्य केल्या तर फक्त जिल्ह्यात ६५ अधिकारी शिल्लक राहतील त्यावरती बीडमध्ये पोलिसांचे काम कसे चालणार चालणार? असा सवाल उपस्थित होत आहे. राज्याच्या पोलीस महासंचालक यांच्याकडे ५९ विनंती अर्ज तर छत्रपती संभाजीनगर विशेष पोलीस महारीक्षक यांच्याकडे या ४८ विनंती बदली अर्ज करण्यात आले आहे.

बीड जिल्ह्यातील एकूण पोलीस निरीक्षक ते उपविभागीय पोलिस अधिकारी अशी १८८ पदे आहेत. त्यापैकी कार्यरत १७२ आहेत. या पैकी १०७ लोकांनी बदलीसाठी विनंती अर्ज केले. काही जणांनी राज्याच्या पोलीस महासंचालकाकडे अर्ज केला आहे.

घरकुल योजनेचा हप्ता टाकण्यासाठी लाच घेताना अभियंता पकडला

जालना । प्रतिनिधी

प्रधानमंत्री घरकुल योजना अंतर्गत लाभार्थ्याला दुसरा हप्ता टाकण्यासाठी भोकरदन पंचायत समिती चा अभियंताला लाज घेतानी पकडलं. अभियंता प्रदीप रंगनाथ राठोड कंत्राटी ग्रामीण गृहनिर्माण अभियंता पंचायत समिती भोकरदन जि. जालना यांना २०,०००/- हजार रुपये लाचेची मागणी करुनु पहिला हप्ता ५,०००/-रुपये स्विकारतांना रंगेहाथ पकडले.

यातील तक्रारदार यांच्या चुलतीस पंतप्रधान आवास योजनेतून मिळालेल्या घरकुलाचा दुसरा हप्ता देण्यासाठी यातील कंत्राटी प्रदीप रंगनाथ राठोड, यांनी तक्रारदारास २०,०००/- हजार रुपये लाचेची मागणी केली. परंतु तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी ॲन्टी करप्शन ब्यूरो, जालना यांचेकडे तक्रार केली. सदर तक्रारीवरुन दि. २७.०२.२०२५ रोजी पंचायत समिती कार्यालय भोकरदन च्या आवारात लाच मागणी पडताळणी केली असता कंत्राटी प्रदीप रंगनाथ राठोड, यांनी तक्रारदार यांच्या चुलतीचा पंतप्रधान आवास योजनेतुन मिळालेल्या घरकुलाचा दुसरा हप्ता देण्यासाठी पंचासमक्ष २०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ५,०००/- रुपये लाचेची रक्कम स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पण्ण झाले. त्यावरुन दि.२८.०२.२०२५ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान कंत्राटी प्रदीप रंगनाथ राठोड यांनी पंचायत समिती कार्यालय भोकरदन च्या पार्कींगमध्ये ५,०००/-रुपये लाचेची रक्कम स्विकारली व पंचायत समिती कार्यालय भोकरदन च्या समोर असलेल्या हिंदुस्तान झेरॉक्स व ग्राहक सेवा केंद्राचे चालक अस्लम बेग यांचेकडे देउन ते स्वतःचे खात्यावर टाकण्यास सांगितले असता कंत्राटी प्रदीप रंगनाथ राठोड यांना ॲन्टी करप्शन ब्युरो, जालना चे पोलीस निरीक्षक श्री. अविनाश घरबुडे यांनी व त्यांचे पथकाने ताब्यात घेतले असून लाचेची रक्कम ग्राहक सेवा केंद्राचे चालक अस्लम बेग यांच्याकडुन जप्त करण्यात आली आहे. कंत्राटी आलोसे यांची अंगझडती घेतली असता रोख २०/- रुपये, मोटार सायकलची चाबी व ०१ मोबाईल मिळून आला. प्रदीप रंगनाथ राठोड, कंत्राटी अभियंता, यांचेविरुध्द पोलीस ठाणे भोकरदन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. सदरची कामगिरी मा. श्री. संदीप आटोळे, पोलीस अधीक्षक, मा. श्री. मुकुंद आघाव, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर, पोलीस उपअधीक्षक श्री. बी. एस. जाधवर लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय जालना, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अविनाश घरबुडे व पथकातील अंमलदार श्रीनिवास गुड्डुर, शिवलिंग खुळे व भालचंद्र बिनोरकर यांनी केली.

तोंडाला काळे फासण्याचा इशारा देताच शिक्षकावर गुन्हा दाखल

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी मंगल धुपे यांच्या तोंडाला काळे फासण्याची इसारा धमकी देणाऱ्या शिक्षकांच्या विरोधात शिक्षणाधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान यासंदर्भात शिक्षणाधिकारी श्रीमती मंगल धुपे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तक्रारीत म्हटले आहे की शुक्रवार दिनांक २७ रोजी सायंकाळी ६:३० वाजेच्या सुमारास भोकरदन तालुक्यातील चांदई एक्को येथील शिक्षक जगन विठोबा वाघमोडे आणि इतर पाच सहा जण जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागात येऊन शिक्षण अधिकाऱ्यांसोबत एकेरी भाषा वापरू लागले त्यानुसार तक्रारीत म्हटले आहे की तू शिक्षणाधिकारी आहेस त्याच्याशी मला काही देणे घेणे नाही तू कार्यालयाच्या खाली उतर तुला पाहून घेतो तो ऑफिस मधून घरी कशी जाते ते बघतो तसेच तुझ्या तोंडाला काळे लावतो असे बोलून मोठ्या आवाजात अरेरावीची भाषा जगन वाघमोडे हे करीत होते त्याचवेळी कार्यालयात उपस्थित असलेल्या मकरंद शेवलीकर आणि प्रसन्न कुमार जोगदंड यांनी या आरोपींना कार्यालयाच्या बाहेर काढले.

दरम्यान या संदर्भात आपली बाजू मांडताना जगन विठोबा वाघमोडे म्हणाले की, दिनांक २७ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालय जालना येथे मराठवाडा शिक्षक संघाचे पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध समस्यांसंदर्भात चर्चा करण्यासाठी गेलो असता माध्यमिक शिक्षणाधिकारी श्रीमती मंगला धुपे या हजर नव्हत्या. त्यावेळी कार्यालयीन अधीक्षक तथा प्रभारी वेतन अधीक्षक मकरंद सेवलीकर हे हजर होते. त्यांनी सर्व पदाधिकाऱ्यांसोबत व्यवस्थित चर्चा केली, परंतु ज्या वेळेस माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयात आल्या त्यावेळेस आम्ही पुन्हा एकदा त्यांच्याकडे चर्चा करण्यासाठी गेलो. आम्ही चर्चा करत असतानाच त्यांनी मोठमोठ्या आवाजात मला धमकावले. म्हणाल्या तुम्ही माझ्या विरोधात बातम्या देता, माझी बदनामी करता, एकटा जगन वाघमोडे माझी बदनामी करत असतो, वर्तमानपत्रात माझ्या विरोधात बातम्या देत असतो आणि स्टेटस ठेवत असतो. या कारणाने माझ्या अंगावर त्या धावून आल्या व मलाच अरेरावीची भाषा वापरली. आमच्या सोबतही महिला शिक्षिका असतात, त्यांनी त्यांना आवरले. शिक्षकांना होणाऱ्या समस्यांसंदर्भात शिक्षणाधिकाऱ्यांच्या विरोधात आवाज उठवला की त्या सुडाची भावना मनात ठेवून इतर कर्मचाऱ्यांवर दबाव टाकत असतात. या विरोधातच आम्ही त्यांना बोलण्यासाठी गेलो असता त्यांनी अशी भाषा वापरली व गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली.

स्थानिक गुन्हे शाखेची कारवाईः २ सराईत गुन्हेगार अटक,१५ लाखाचा मुद्देमाल जप्त २२ गुन्हे उघडकीस

जालना । प्रतिनिधी

पोलीस ठाणे चंदनझिरा, येथे फिर्यादी अंकुश थोरात त्यांच्या व त्यांच्या शेजारी राहणारे गणेश विठठल घोरपडे व विजयमाला धोंडीराम चव्हाण यांच्या तीन गाई अज्ञात चोरांनी चोरी केल्या असल्याचे कारणावरुन चंदनझिरा पोलीस ठाणे यथे गु.र.क्र. ७१/२०२५ कलम ३०३(२) मा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांनी एक पथक तयार करुन गुन्हा उघडकीस आणणेबाबत सुचना दिल्या होत्या. त्यानुषंगाने गुन्ह्यातील अज्ञात गुन्हेगारांचा शोध घेत असतांना गुप्त बातमीदारामार्फत व तांत्रिक माहितीच्या आधारे सदरचा गुन्हा हा आरोपी शेख इस्माईल शेख इब्राहिम, वय-२८ वर्ष, रा. सिटीएस नं. ९१, जाफरनगर, मालेगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक २) इस्तेयाक खान अल्ताफ खान, वय-२९ वर्ष, रा.घर नं.८३५, गली नं.०७, गुलशेरनगर, मालेगांव, जि. नाशिक यांनी व त्याच्या साथीदारांनी केला असून ते सध्या सिल्लोड येथे असल्याची माहिती मिळाल्याने त्यांचा सिल्लोड येथे शोध घेतला असता ते मिळुन आले असुन उर्वरित ०३ आरोपी फरार शाले आहेत, ताब्यात घेतलेल्या आरोपीतांच्या ताब्यातून गुन्हयात वापरलेली ०१ इनोव्हा कार व ०३ मोटार सायकल, मोटार रिवायडींगकामी वापरण्यात येणारे तांबा क्वाईल, तार असा एकुण रु.१५,५१,४००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीने गौवंश चोरीच्या आणखी गुन्हयाबाबत चौकशी केली असता त्यांनी जालना जिल्हयातील नंदापुर शिवार, मांजरगाव शिवार, भारज शिवार, डोंगरगाव शिवार, लिंगेवाडी शिवार, टाकळी शिवार, कोठा दाभाडी, संगमेश्वर गव्हाण शिवार, वरुड बुद्रुक शिवार, नांदखेडा शिवार, मोहळाई शिवार, शिपोरा बाजार, म्हसरुळ शिवार, जवखेडा खुर्द, जळगाव सपकाळ शिवार, कुकडी शिवार, जळगाव सपकाळ शिवार, पिंपळगाव शिवार, बिगळखेडा शिवार या ठिकाणाहून रात्रीच्या वेळी जनावरे चोरी केले असल्याचे कबुल दिली असुन एकुण १९ गुन्हे उघडकीस आणले आहे. तसेच त्यांनी मालेगाव येथुन इनोव्हा कारमध्ये चोरुन आणलेले मोटार रिवायडींगकामी वापरण्यात येणारे तांबा क्वाईल, तार मिळून आले असुन सदरबाबत पोलीस ठाणे तालुका, मालेगांव, नाशिक येथे गु.र.क्र. १४१/२०२५ कलम ३३१(४), ३०५(१), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल आहे. तसेच आरोपीतांच्या ताब्यातुन मिळालेली होंडा यूनिकॉर्न मोटार सायकल सुध्दा चोरीची असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने सदर मोटार सायकल पडेगाव येथून चोरी केली असून पोलीस ठाणे छावणी, छत्रपती संभाजीनगर येथे गु.र.क्र.३६/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या. सं. अन्वये गुन्हा दाखल आहे. सदरची कारवाई अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि योगेश उबाळे, पोउपनि राजेंद्र वाघ व सोबत स्थागुशाचे अमंलदार रामप्रसाद पव्हरे, प्रभाकर वाघ, रस्तुम जैवाळ, गोपाल गोशिक, रमेश राठोड, सागर बाविस्कर, कैलास खाडे, इरशाद पटेल, सतिष श्रीवास, संदीप चिचोले, रमेश काळे, सचिन राऊत यांनी केली आहे

पान १ वरून...

राज्यात बंदी चोर

हा खर्च कमी करण्यासाठी शेतकरी तणनाशकांची मोठ्या प्रमाणात फवारणी करतात. तणनाशकाची फवारणी केल्यास त्याचा काही प्रमाणात परिणाम संबंधित पिकावरही होतो. मात्र, चोर बिटी या कापसाची लागवड केल्यास तणनाशकाचा काहीच परिणाम पिकावर होत नाही. अतिशय घातक असलेली तणनाशके वापरली जात असल्याने मानवाला कॅन्सर होतो किंवा त्याचा मृत्यूसुद्धा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने चोर बिटी या बियाण्यांवर बंदी घातली आहे. तेलंगणातही या बियाण्यांवर बंदी आहे. मात्र, तेलंगणा राज्यातून प्रतिबंधित बियाणे चंद्रपूर जिल्ह्यात आणले जात आहेत. याकडे कृषी विभागाचे दुर्लक्ष होत आहे.

वाल्मिक कराडला जेलमध्ये

सध्या जिल्हा कारागृहात असून तेथे त्यांना व्हिआयपी ट्रिटमेंट दिली जात असल्याचा आरोप देशमुख कुटुंबाचे नातेवाईक दादासाहेब खिंडकर यांनी केला असून याबाबत आपण माहिती अधिकारात जेलमधील सर्व सिसिटिव्ही मागवण्यात येणार असल्याचे सांगितले आहे. त्यांना ऐवढी चांगली वागणूक दिली जात असेल तर त्यास जेलमध्ये ठेवण्याऐवजी एखाद्या हॉटेलच्या रुममध्येच ठेवा, असेही धनंजय देशमुख यांनी म्हटले आहे. देशमुखांच्या आरोपानंतर विरोधकांनी जेल प्रशासन आणि धनंजय मुंडे यांच्यावर हल्लोबोल केला आहे. यात विजय वड्डेटीवार, अनिल देशमुख, जितेंद्र आव्हाड यांनी याबाबत चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

आरटीई प्रवेशासाठी

४७ हजार ४९२ बालकांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. त्यामुळे शिक्षण विभागाने ही मुदतवाढ दिली असल्याचे प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी स्पष्ट केले.

पवार काकांची शॅडो कॅबिनेट,

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या बैठकीला सर्व आमदारांची आणि खासदारांची उपस्थिती होती. पक्ष वाढीसाठी काही प्रमुख नेत्यांवर जबाबदारी देण्यात आली आहे. जयप्रकाश दांडेगावकर, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, रोहित पवार, एकनाथ खडसे, हर्षवर्धन पाटील यांच्यावर पक्षाने जिल्ह्यांची जबाबदारी दिली आहे. या नेत्यांनी प्रत्येक महिन्यात जिल्ह्यांचे दौरे करून आढावा घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच जास्तीत जास्त तरुण चेहऱ्याला संधी देण्याची रणनीती अखण्यात आली आहे. जिथे रिक्त पद असतील तिथे पद भरली जाणार आहेत. पदाधिकारी बदलायची जर गरज वाटत असेल तर पदाधिकारी देखील बदलले जातील. पक्षाच्या नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी नव्या उमेदीने कामाला लागण्याच्या सूचना शरद पवारांनी दिल्या आहेत. पुढच्या तीन महिन्यात महाराष्ट्र पिंजून काढा आणि त्याचा अहवाल द्या, असे आदेश पवारांनी नेत्यांना दिले आहेत. या बैठकीबाबत पक्षाचे खासदार अमोल कोल्हे म्हणाले की, शरद पवारांच्या पक्षाच्या बैठकीत महत्वपूर्ण निर्णय झाले. त्यामध्ये सरकारच्या पहिल्या १०० दिवसांच्या कार्यक्रमावर लक्ष ठेवणारी टास्क टीम तयार करण्यात आली. तसेच विभागनिहाय जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले असून ७-८ मार्चपासून या नेत्यांना विभागनिहाय दौरे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राज्याच्या विरोधी पक्षनेतेपदाबाबत निर्णय हा महाविकास आघाडीच्या समन्वय समितीची बैठक होईल. या अधिवेशनात विरोधी पक्ष नेतेपदाबाबत जो प्रस्ताव दिला जाईल त्यावर सरकारनंही विचार करावा असा ठराव या बैठकीत मांडण्यात आला आहे.

इष्टांक वाढीसंदर्भात धनंजय मुंडे यांनी

काही तक्रारी आल्या असून त्याबाबत धनंजय मुंडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली व योग्य त्या सूचना केल्या. या बैठकीस विभागाच्या सहसचिव, उपसचिव यांसह सर्व जिल्ह्यांचे जिल्हा पुरवठा अधिकारी आदी दृकश्राव्य माध्यमाद्वारे उपस्थित होते.

आजारी पण कामावर

धनंजय मुंडे यांच्या दोन्ही डोळ्यांचे नुकतेच ऑपरेशन झाले असून त्यांना बेल्स पाल्सी या आजाराचे निदानही झाले होते. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्याने काही दिवस विश्रांती घेतल्यानंतर त्यांनी पुन्हा एकदा आपल्या कामास त्यांनी सुरुवात केली आहे. डोळ्यांची हालचाल आणि अधिक काळजी म्हणून त्यांनी गॉगलचा वापर करत मीटिंग घेतली. अद्यापही स्पष्टपणे सलग बोलण्यास त्रास होत असतानाही त्यांनी आपल्या कामकाजास आता सुरुवात केली आहे.

युती टिकवायची असेल

काही दिवसापुर्वी एका कार्यक्रमात बोलताना सांगितले होते की, देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाहून जनतेने मतदान केले. त्यांचे नेतृत्व स्विकारल्याने भाजपचे जास्त आमदार निवडून तर आलेच पण घड्याळ आणि बाणाला सुध्दा लोकांनी फडणवीसांमुळे मतदान केले, असे विधान केले होते. त्यांच्या या विधानाचा समाचार घेत अजित पवारांनी धसांना चांगलेच सुनावले.युती टिकवायची असेल तर काही लोकांनी तारतम्य ठेवून बोलावे, असा टोला सुरेश धसांचे नाव न घेतला अजित पवार यांनी लगावला. त्यामुळे यावर धस आता काय बोलतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दत्ता गाडेला १२ पर्यंत

आरोपी दत्तात्रय गाडे फरार असताना त्याने शेतात आत्महत्या करण्याचा देखील प्रयत्न केला असल्याचे समजते. मात्र गळफास घेतलेला दोर तुटल्याने जीव वाचला. आत्महत्या करण्याचे साहित्य देखील घटनास्थळी सापडले आहे. या संदर्भातील माहिती पोलिसांनी दिली आहे. तसेच ज्यांच्या मदतीने आरोपी मिळाला त्यांना १ लाखांचे बक्षीस देणार असल्याचे अमितेश कुमार यांनी स्पष्ट केले आहे.

हिमस्खलन झाल्याने ५७ जण बर्फात दबले

गेल्याचे सांगण्यात येत आहे. ते लोक तिथे बांधकाम करत होते. हिमस्खलनाच्या वृत्ताने संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. सततच्या बर्फवृष्टीमुळे दळणवळण सेवा ठप्प झाल्याचे सांगण्यात येत आहे. हवाई दलाची मदत घेतली जात आहे.

तुहिन कांत पांडे

सेबीच्या १० व्या प्रमुख माधबी पुरी बुच यांचा ३ वर्षांचा कार्यकाळ शुक्रवारी (२८ फेब्रुवारी) पूर्ण झाला आहे. त्यामुळे नव्या प्रमुखांची नियुक्ती करण्यात आली आहे. गुरुवारी रात्री उशिरा जारी करण्यात आलेल्या केंद्र सरकारच्या आदेशानुसार मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने पांडे यांची सेबीच्या प्रमुखपदी नियुक्ती करण्यास मान्यता दिली आहे. पांडे हे १९८७ च्या बॅचचे आयएएस अधिकारी असून, ते महसूल विभाग हाताळणारे वित्त मंत्रालयातील सर्वात वरिष्ठ अधिकारी आहेत. ७ सप्टेंबर २०२४ रोजी त्यांची वित्त सचिव म्हणून नियुक्ती झाली होती.

उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच उष्णतेने

उष्णतेच्या लाटेचे दिवस सामान्यपेक्षा अधिक राहण्याचा इशारा भारतीय हवामान विभागाकडून देण्यात आला आहे.

प्राध्यापक भरतीचा

झाला आहे. विद्यापीठांमध्ये सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक पदांच्या निवड प्रक्रियेसाठी गुणांकन पद्धती निश्चितही केली आहे. त्यानुसार भरतीसाठी उमेदवारांची शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन आणि अध्यापनाला ८० टक्के गुण, तर मुलाखतीसाठी २० टक्के गुण दिले जाणार आहेत. त्याचबरोबर निवड प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी निवड समितीच्या बैठकांचे व्हिडिओ चित्रीकरणही केले जाणार आहे.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार, दि. १ मार्च २०२५

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त एमटीडीसीकडून महिला पर्यटकांसाठी ५० टक्के सवलत – पर्यटन मंत्री शंभूराज देसाई

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे () आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून राज्यातील महिला पर्यटकांसाठी १ ते ८ मार्च २०२५ या कालावधीत एमटीडीसीच्या पर्यटक निवासांमध्ये ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे. या सवलतीसह विविध पर्यटन उपक्रम देखील राबविण्यात येणार आहेत. ''आई'' महिला केंद्रित/लिंग समावेशक पर्यटन धोरणांतर्गत हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे, अशी माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

पर्यटन मंत्री श्री. देसाई म्हणाले की, एमटीडीसीने महिलांसाठी समर्पित आई हे महिला केंद्रित पर्यटन धोरण अंमलात आणले आहे. महिला पर्यटकांसाठी प्रवास अधिक सुरक्षित, सोयीस्कर आणि संस्मरणीय करण्यासाठी प्रयत्नशील आहोत. २०२४ मध्ये एमटीडीसीच्या महिला दिन विशेष सवलतीला भरघोस प्रतिसाद मिळाला होता. १५०० हून अधिक महिला पर्यटकांनी या योजनेचा लाभ घेतला. यामुळे सकारात्मक प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर, २०२५ मध्येही ही योजना राबवण्यात येणार आहे.महिला पर्यटक .. या संकेतस्थळावर जाऊन सवलतीचा लाभ घेऊ शकतात. राज्यमंत्री इंद्रनील नाईक म्हणाले की, पर्यटन क्षेत्रातील महिलांचा सहभाग वाढावा यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. महिला पर्यटकांसाठी हा विशेष उपक्रम आहे एमटीडीसीची नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि खारघर (नवी मुंबई) येथील महिला-संचालित पर्यटक निवास पूर्णतः महिलांद्वारे संचलित केली जातात. यामध्ये रिसॉर्ट व्यवस्थापन, सुरक्षा, टॅक्सी सेवा, स्वच्छता, हॉटेलिंग आदी सर्व जबाबदाऱ्या महिलांकडेच आहेत. यामुळे महिलांना पर्यटन क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

बचतगटाच्या महिलांसाठी स्वतंत्र बँकेची गरज - अर्जुन खोतकर

जालना । प्रतिनिधी

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा उमेद अंतर्गत कार्यरत असलेल्या महिला बचत गटाच्या वस्तूचे प्रदर्शन व विक्री जानकी महोत्सव २०२५ उद्घाटन आमदार अर्जुन खोतकर यांच्या हस्ते संपन्न झाले. बचत गटाच्या महिलांसाठी स्वतंत्रपणे बँक असावी असे प्रतिपादन अर्जुन खोतकर यांनी उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.

स्वर्गीय कल्याणराव घोगरे क्रीडा संकुल येथे जानकी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यावेळी आमदार संतोष दानवे विधानसभा सदस्य आमदार राजेश राठोड, उपायुक्त सुरेश बेदमुथा,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब घुगे, उपायुक्त विकास डॉ. सीमा जगताप प्रकल्प संचालक सुनील पठारे यांच्यासह जिल्हास्तरीय विभाग प्रमुख गटविकास अधिकारी आदी मान्यवरांची उपस्थिती होती. आ.अर्जुन खोतकर यांनी यावेळी महिलांनी एकत्रपणे काम करावे महिलांसाठी लवकरात लवकर कर्ज उपलब्ध व्हावे यासाठी स्वतंत्रपणे बँक अस्तित्वात असावी. झालेले कर्ज इतरत्र न खर्च करता व्यवसायासाठीच खर्च करावे, महिलांमध्ये विविध प्रकारचे कलागुण असून बचत गटाच्या माध्यमातून त्यांना ते विकसित करण्याची एक संधी मिळाली आहे, महिलांनी तयार केलेले उत्पादन हे

अत्यंत दर्जेदार असल्याने त्याला बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी सर्व पातळीवर प्रयत्न करण्याची गरज असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

प्रभाग निहाय ग्राम संघ कार्यालया साठी इमारती निर्माण होणे गरजेचे आहे.

महिला बचत गटाच्या भोकरदन तालुक्यातील १६ प्रभागा मधील ग्राम संघासाठी आवश्यक असणारे कार्यालय बांधकाम आगामी एक वर्षात पूर्ण करणार असल्याचे प्रतिपादन आमदार संतोष दानवे यांनी यावेळी व्यक्त केले. लखपती दीदी अंतर्गत बंद पडलेले अनेक बचत गट सुरू झाले असूनही अभिनंदन बाब असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.जानकी महोत्सवात नागरिकांनी जास्तीत जास्त प्रमाणात वस्तूंची खरेदी करावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

उत्कृष्ट उत्पादनासोबतच स्वच्छतेकडे लक्ष द्या –आमदार राजेश राठोड

महिलांनी उत्कृष्ट उत्पादनाच्या पॅकेजिंग व मार्केटिंगसह स्वच्छतेकडे लक्ष द्यावे ,मी माझ्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात स्वच्छता अभियानापासून केली. गाव असो परिसर असो किंवा तयार होणाऱ्या वस्तूंना स्वच्छता किती महत्त्वाची आहे याकडे महिलांनी विशेष लक्ष द्यावे असे आव्हान विधान परिषदेचे सदस्य आमदार राजेश राठोड यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी स्टेट बँक ऑफ इंडिया च्या वतीने ३८ कोटी व १८० कोटी रुपया[illegible]देश मान्यवरांच्या हस्ते बचत गटांना सुपूर्त करण्यात आला. ग्रामीण भागातील दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी केंद्र शासनाने ग्रामविकास मंत्रालयाच्या माध्यमातून व जागतिक बँकेचे अर्थसहाय्यातून पंडित दीनदयाल उपाध्याय अंत्योदय योजना अंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची सुरुवात केली आहे या अंतर्गत आज जालना जिल्ह्यात १५ हजार २३४ बचत गटांची स्थापना करण्यात आली असून यातील निवडक बचत गटांच्या तसेच विभागातील निवडक बचत गटांच्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या वस्तूचे प्रदर्शन व विक्री जानकी महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. सदरील प्रदर्शनात महिला बचत गटाच्या वतीने तयार करण्यात आलेले लोणचे, गोडंबी, लाकडी खेळणी, घोंगडी आदी सह विविध प्रकारचे चविष्ट व रुचकर जेवण, अल्पोपहार दही धपाटे,भरीत, झुणका- भाकर,मिसळ, वडापाव यासह विविध प्रकारचे साहित्य या ठिकाणी विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आले आहे. दिनांक २८ फेब्रुवारी ते ६ मार्च पर्यंत सदरील प्रदर्शन हे सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे. रात्रीच्या वेळी विविध प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमास जिल्हाभरातून मोठ्या संख्येने महिलांची उपस्थिती होती.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर शाळेत विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शन व आनंद मेळावा

कळंब । प्रतिनिधी

जागतिक विज्ञान दिनानिमित्त शुक्रवारी कळंबमधील डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यालय शाळेमध्ये विज्ञान प्रदर्शन चे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल कुतूहल निर्माण करण्याबरोबरच यांच्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्यासाठी हा दिवस साजरा करण्यात आला.विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेचे मार्गदर्शक रविकांत सोनवणे, मुख्याध्यापक वैजनाथ चौधरी,शिवशाहीर बंडू खराटे लोहटा (पश्चिम)सरपंच संजय अडसूळ यांच्या हस्ते करण्यात आला .प्रदर्शनात इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विविध प्रयोगाचे आयोजन केले होते ध्वनीचे प्रवर्तन मानवी श्वसन उच्छ्वास यांचे प्रतिकृती

असणारी फुफुसांचे कार्य,ज्वालामुखी यासारखे प्रयोग प्रदर्शनात मांडण्यात आले होते.तसेच विज्ञान प्रयोगासाठी वापरण्यात येणारी उपकरणे, सूक्ष्मदर्शक यांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी यासाठी विविध प्रकरणे प्रकारे मांडणी करण्यात आली होती.पूर्व प्राथमिक शाळेत आनंदा मेळावा भरवण्यात आला होता.विविध स्टॉल फळ भाज्यांचे तसेच खाऊ वाटपाचे स्टॉल मांडण्यात आले होते.पहिली ते नववी तील सुमारे २७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता या प्रदर्शनाचा लाभ विद्यार्थी तसेच पालकांनी घेतला प्रदर्शनासाठी लागणारे मार्गदर्शन शाळेचे ट्रस्टी रविकांत बापू सोनवणे यांच्यासह मुख्याध्यापक वैजनाथ चौधरी ,शिक्षक शरद पवार ,प्रवीण तांबडे ,अमोल धस, कल्याण चौधरी,अभिजीत राऊत सर्व शिक्षकांनी केले.

निश्चित दिशेने प्रवास केल्यास यश हमखास मिळते– गोरक्षनाथ आबुज

बीड । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी विद्यार्थी दशेतच आपले ध्येय ठरवले पाहिजे व त्या दिशेने प्रवास केला तर यश हमखास मिळते असे प्रतिपादन शिवशंभु प्रतिष्ठान देवगिरी प्रांताचे गोरक्षनाथ आबुज यांनी प्रतिपादन केले.

शिक्षणतीर्थ संस्कृती विद्यालय व विवेकवर्धिनी गुरुकुलाचा पालक मेळावा नुकताच पार पडला.

गुरुकुलाचा पालक मेळावा हा वैशिष्ट्यपूर्ण असतो.या कार्यक्रमाला ३०० विद्यार्थ्यांचे पालक नातेवाईक इतर संस्थांचे प्रतिनिधी सामाजिक क्षेत्रातील लोक पत्रकार उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाज भूषण नितीन कोटेचा होते. या कार्यक्रमात पालकांना मार्गदर्शन प्रमुख वक्ते गोरक्षनाथ आबुज म्हणाले की, सामान्यातून असामान्य व्यक्तिमत्व घडलेली आपण समाजामध्ये बघतो.

ज्या लोकांनी प्रचंड यश मिळवले आहे त्यांनी स्वतःच्या क्षमतांचा विकास करून योग्य दिशेने प्रवास केला म्हणून त्यांना यश मिळाले.परमेश्वराने प्रत्येकाला बुद्धी दिली आहे त्याचा वापर आपण कसा करतो यावर आपले यश अवलंबून आहे.शिक्षण तीर्थ संस्कृती विद्यालयामध्ये चारित्र्यसंपन्न विद्यार्थ्यांची जडण घडण डॉ. दत्ता नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. येथे शिकलेला विद्यार्थी भविष्यातील आव्हाने सहज पार करून यश मिळवेल याची खात्री आहे. आज मंचावर समाजातील विविध क्षेत्रात काम करणारे मंडळी उपस्थित आहेत. हा योगायोग डॉ. दत्ता नलावडे यांनी जुळवून आणला आहे. गुरुकुलाचे काम शिक्षण क्षेत्रासाठी दीपस्तंभाप्रमाणे आहे.यावेळी मंचावर नितीन कोटेचा, इंद्रसेन गोरे, डॉ. प्रदीपकुमार उजेगर डॉक्टर दत्ता नलावडे , मुख्याध्यापिका अर्चना जाणवळे उपस्थित होत्या.

रामराव जाधव यांचा सेवागौरव सोहळा उत्साहात

अंबाजोगाई । प्रतिनिधी

वेणुताई चव्हाण महिला महाविद्यालयातील शिक्षिकेत्तर कर्मचारी राम जाधव हे ३५ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले.त्यांच्या सेवेचा यथोचित गौरव सोहळा महाविद्यालयात उत्साहात संपन्न झाला.यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या अखिला गौस,तसेच जाधव यांच्या परिवारातील सदस्य उपस्थित होते.जाधव यांनी आपल्या सेवाकालात महाविद्यालयातील विविध जबाबदाऱ्या सक्रियपणे सांभाळल्या.

तसेच संस्थेविषयी स्नेहभाव जोपासून तळमळीने कार्य केले तो आदर्श इतरांनी घ्यावा असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते त्यांच्या सेवेचा यथोचित सपत्नीक गौरव मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. या कार्यक्रमास प्रा यशवंत चव्हाण, प्रा. सविता कदम, लिपीक वसंत काळे, सत्यवान शिंदे शिक्षिकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यो.नू.विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी नूतन विद्यालयाच्या मंदिर विभागात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा झाला

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे संचालक लंकेश वैद्य होते. प्रमुख पाहुण्या म्हणून प्रसिद्ध ग्रामीण साहित्यिका अर्चना स्वामी ह्या तर मंचावर विभाग प्रमुख एस.बी.शिंदे,मराठी विभाग प्रमुख एस.के. डोर्ले आदी उपस्थित होते. अर्चना स्वामी यांनी आपल्या मनोगतातून मराठी भाषेची वेगवेगळी रूपे कथा कथनातून उलगडून दाखवली.

त्यांनी टार्गट टोळी ही कथा सांगितली.नंतर कर्करोगाविषयी माहिती दिली.एस.बी.शिंदे यांनीही मनोगत व्यक्त केले.अध्यक्षीय समारोपात लंकेश वैद्य यांनी मराठी भाषा समृद्ध भाषा असून म्हणून ती टिकण्यासाठी मराठीतच बोलले पाहिजे व भाषा समृद्धीसाठी पुस्तकांचे वाचन आवश्यक

असल्याचे सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी नाटीका, पोवाडा, समुहगीत,नृत्य यांचे सादरीकरण केले. प्रतिमापूजन व आम्हास भाग्य लाभले बोलतो मराठी या गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ.आर.व्ही.जुजगर यांनी केले.संचालन चि. आयुष कुलकर्णी व प्रणीत ठाणगे यांनी,तर उपस्थितांचे आभार सौ.एस.एच. गंगणे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशास्वितेसाठी बी.जे.सिनगारे, एस.एस.देशपांडे,के.एस.कुलकर्णी,श्रीमती. एस.जे.देशमुख,कृष्णा काटे,सागर गरड आदींनी परीश्रम घेतले यावेळी शिक्षक, विद्यार्थी,पालक उपस्थित होते.

खोलेश्वर महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

खोलेश्वर महा विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खोलेश्वर संकुलाचे अध्यक्ष विजय वालवडकर होते तर व्याख्याते म्हणून बिपीन क्षिरसागर होते. विशेष उपस्थिती म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.प्रीती पोहेकर, बिभीषण फड,दिपक फुलारी, उपप्राचार्य प्रा.आनंद पाठक, डॉ.रवींद्र कुंबेफळकर आदी उपस्थित होते.क्षीरसागर म्हणाले की मराठी भाषेचा गौरव दिन साजरे करणे एवढ्या पुरतेच मर्यादित न राहता मराठी भाषा लोकांपर्यंत आत्मसात कशी होईल यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे मराठी भाषे विषयीचे ज्ञान समाजापर्यंत पोहोचेल तेव्हा खऱ्या अर्थाने आपण मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्याला महत्त्व राहील. आपण भाषा सैनिक म्हणून काम केले पाहिजे अध्यक्षीय समारोपात विजय वालवडकर म्हणाले की, मराठी भाषा ही मर्यादित असता कामा नये ती भाषा बोलण्यामध्ये व लिहिण्यामध्ये भाषेचे सौंदर्य असले पाहिजे. मराठी भाषेचा व्यवहारामध्ये कसा उपयोग होईल याचा विचार करावा मराठी भाषा शुद्ध कशी होईल हे पहावे . कार्यक्रमाचे प्रास्ताविक.देविदास खोडेवाड यांनी केले तर शिवकन्या शिंदे हिने संचालन उपस्थितांचे आभार मराठी विभागाचे प्रा.डॉ.गौतम गायकवाड यांनी मानले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तरुणांच्या पुढाकाराने छावा सिनेमा नांदूरघाटमध्ये छोट्या पडद्यावर

नांदुर घाट । प्रतिनिधी

देशामध्ये बॉक्स ऑफिस वर काही दिवसातच मोठी कमाई करणारा चित्रपट म्हणून छावा चित्रपटाकडे पाहिला जात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे पुत्र स्वराज्याचे दुसरे छत्रपती धर्मवीर छत्रपती संभाजी राजे यांच्या जीवनपटावरील हा चित्रपट आहे. त्यामध्ये त्यांच्या साहस पराक्रम स्वराज्याची निष्ठा जनतेविषयी असलेले प्रेम आणि धर्माविषयी असलेले प्रेम हे प्रखरपणे दिसून येते आजच्या पिढीला छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्या बद्दल देशांमध्ये माहिती या चित्रपटाद्वारे मिळत आहे चित्रपटांमध्ये खूप कमी कालावधीमध्ये बरीचशी त्यांची कामगिरी घेतलेली आहे त्यामध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी राजे यांना

पकडणे शक्य नव्हते परंतु फंद फितुरीमुळे महाराजांना पकडून देण्यात आले त्यानंतर औरंगजेबाने त्यांचे हाल हाल केले धर्म बदल स्वराज्य आमच्या हाती दे अशा प्रकारच्या मागण्या करत छत्रपती धर्मवीर संभाजी राजे यांना व कवी कलश यांना हाल हाल करून मारले हा सीन खूप भावनिक करणारा प्रेक्षकांसाठी होता. प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू लहान चिमुकले हंबरडा फोडून रडलेले देखील पाहायला मिळाले देशांमध्ये हा चित्रपट खूप मोठ्या प्रमाणात लोक पाहत असताना ग्रामीण भागामध्ये बऱ्याचशा लोकांना चित्रपटगृहावर जाऊन चित्रपट पाहणे शक्य होणार नाही त्यामुळे नांदूर घाट येथील वैभव जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांनी नांदुर घाट व परिसरातील नागरिकांसाठी छोट्या पडद्यावर नांदुर घाट येथे हा चित्रपट दाखवला त्यांच्या या उपक्रमाबद्दल त्यांचे सर्व नांदुरघाट कर अभिनंदन व कौतुक करत आहेत.

पान ६ वरून...

युसूफवडगांव येथे छत्रपती

जावळे, रूपेश बोरगावकर,मन्मथ पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले.तद्नंतर सजवलेल्या रथातुन छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वरूढ पुतळ्याची गावातुन वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली.यावेळी कर्नाटक येथील कलाकर मंडळींनी विविध देखावे सादर करून मिरवणुकीची शोभा वाढवली तसेच वाणेवाडी येथील लहान वारकऱ्यांनी सुद्धा विविध भक्तीमय व शिवगितांवर टाळमय नृत्य सादर करून भक्तीमय वातावरणात निर्मिती केली तर डिजेच्या तालावर विविध हिंदी-मराठी व शिवबांच्या गितांवर ठेका धरत मनमुराद नाचण्याचा आनंद घेतला.जयंती मिरवणुकीच्या यशस्वीतेसाठी सर्व ग्रामपंचायत सदस्य,सोसायटीचे सदस्य छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष,उपाध्यक्ष व सर्व सभासदांनी परिश्रम घेतले.

तहसिलदारांचा खोरडेपणा

टिपरचा नंबर सांगत आला नाही.तसेच खडीने भरलेला टिपर हा पीडब्लूडी ने दिला आहे. अशी खोटी माहिती दिली तर मुरुमाने भरलेला टिपर हा एसडिओ साहेबांनी पकडला आहे. अशी माहिती दिली आहे.तर पकडलेला खडीचा टिपर पीडब्लूडीला अधिकार आहे का ? यावरुन कसा कारभार सुरु आहे. दिसून येते.

तुम्हाला माहिती देणार नाही

वडवणी तहसिलदार यांची कॉंबिनचे दार उघडे दिसले म्हणून समक्ष भेट घेतली तेव्हा फोनवर तुम्हीच होते का? असा सवाल तहसिलदार यांनी करताच मी फोनवरुन माहिती दिली आहे. आता माहिती देणार नाही असा पवित्रा घेतला यानंतर पत्रकार यांनी समजून सांगण्याचा प्रयत्न केला तेव्हा हि माहिती गौणखनिज अधिकारी यांच्याकडून घ्या.असे सांगितले तर याठिकाणचे गौणखनिज विभागाचे अधिकारी यांच्याशी संपर्क केला आसता म्हणाले कि, मी माजलगांव एसडिओ कार्यालयात दोन दिवसांपासून इंकडेच आहे. टिपर पकलेली माहीती माझ्याकडे आहे. या विषयी काहीच माहिती नाही. असे सांगितले तेव्हा वडवणीचे तहसिलदार यांचा किती कर्तव्यपणा आणि माहिती वजा आहेत. यावरुन दिसून येते.

पान ६ वरून...

शासकीय अध्यापक विद्यालयात

ज्यात त्यांच्या वेशभूषेची प्रगती आणि मराठी संस्कृतीच्या जतनाचे प्रतीक दर्शवले.अनौपचारिक संवाद स्पर्धा: या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मराठीत संवाद साधत, आपली संवाद क्षमता दाखवली.अहवाल लेखन स्पर्धा: विद्यार्थ्यांनी मराठी राजभाषेच्या विविध पैलूंवर आधारित अहवाल लेखन केले.सर्व स्पर्धांमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांच्या उत्साहात आणखी वाढ झाली.कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर अब्दुल नजीब होते. त्यांनी आपल्या भाषणात मराठी भाषेचे महत्व, तिच्या संवर्धनाची आवश्यकता आणि तिच्या उपयोगाची महत्ता मांडली. प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती नलावडे मॅडम उपस्थित होत्या. त्यांनी मराठी भाषेच्या संवर्धनासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली आणि त्यांना आपल्या मातृभाषेचे प्रेम जपण्याचा संदेश दिला.कार्यक्रमाचे मार्गदर्शक प्राध्यापक धोंडगे, प्राध्यापक पुजारी आणि प्राध्यापक पट्टेवार होते. त्यांच्या मार्गदर्शनाखालीच या कार्यक्रमाचा यशस्वी आयोज केला गेला. सूत्रसंचालन डी एल एड दृतिय वर्षाच्या छात्र अध्यापिका शेख महेक आणि सय्यद कुलसुम यांनी केले. त्यांच्या कार्यकुशलतेमुळे कार्यक्रम व्यवस्थित आणि आकर्षकपणे पार पडला.

मराठी मंडळाची स्थापना आणि कार्यकारणीची घोषणा कार्यक्रमाच्या समाप्तीला, शाळेत मराठी मंडळाची स्थापना केली गेली. या मंडळाच्या अंतर्गत, विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचे वाचन, लेखन, गीत गायन आणि संवाद साधण्यासाठी विविध उपक्रम राबवले. तसेच, मंडळाची नूतन कार्यकारणी जाहीर करण्यात आली, ज्यात प्रमुख सदस्य म्हणून काही विद्यार्थ्यांना निवडले गेले. कार्यक्रमाच्या समारोपानंतर, आभार प्रदर्शन पठाण सभा यांनी केले. त्यांनी सर्व पाहुण्यांचे, शिक्षकांचे, आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले, ज्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.आजचा कार्यक्रम मराठी राजभाषेच्या गौरवासाठी आयोजित करण्यात आला. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये त्यांच्या मातृभाषेबद्दल जागरूकता निर्माण झाली आणि मराठी भाषेचे जतन करण्याच्या दिशेने एक महत्त्वाची पाऊल पुढे टाकली गेली.मार्गदर्शन, प्रेरणा, आणि सामूहिक योगदानाने यशस्वी झालेल्या या कार्यक्रमाने मराठी भाषेच्या संवर्धनासाठी एक नवा पाऊल उचलला आहे.

विज्ञानाच्या नवीन

समारोप करताना शैलेश कंगळे यांनी विज्ञान विषयातील नवीन संकल्पना सांगितल्या व त्या आत्मसात कराव्यात.विज्ञान विषयाच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये संशोधनात्मक वृत्ती निर्माण करावी. असा मोलाचा संदेश दिला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सायली संजय देशमुख,अंकिता अशोक पवार,या विद्यार्थीनींनी केले तर प्रास्ताविक कु.दिव्या मगर,आभार कु.अनुष्का सवने ने मानले.या कार्यक्रमाच्या यशस्विते साठी नितीन सोनवणे,सचिन वडगावकर,शिरीष देशमुख,श्रीमती आशालता करपुडे,श्रीमती पल्लवी कानडे,श्रीमती वैशाली फुलसे, वरील सर्व विज्ञान शिक्षक,शिक्षिका यांचे सहकार्य लाभले. यावेळी सर्व विद्यार्थी शिक्षक,शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.कु.शरयू तुपकरी ने सांगितलेल्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाचा समारोप झाला.

संत रविदासांनी संपूर्ण

जाधव, किशोर गायकवाड, अंकुश वाघमारे, सिद्धार्थ मायंदळे, बालासाहेब गवळी आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ.ओमप्रकाश शेटे म्हणाले की, मानवतावाद, बंधुत्ववादी विचार गुरु रविदास व क्रांतिवीर कक्कया महाराजांना प्रिय होते. प्रचंड प्रतिभा, प्रभावी वाणी, संघटन कौशल्य, सामान्य जनतेविषयी आस्था, श्रध्दा, प्रेम, करुणा बंधुत्व हेच त्यांच्या व्यक्तीमत्वाचे अष्टपैलू होते. मन शुद्ध असेल तर कुठेही समाधान लाभते,. 'मन चंगा तो कठौती मे गंगा' ही हिंदी म्हण सुद्धा संत रविदासांच्या वाणीतूनच आली आहे. या विचारधारेतून या दोन्ही संत महात्म्यांच्या विचारांची व्यापकता कळून येते. या दोन्ही महामानवांच्या विचारधारेत 'मनुष्य' हाच केंद्र बिंदू असल्याचेही डॉ. शेटे आपल्या भाषणात म्हणाले.प्रस्ताविक युवा नेते अनिल डोंगरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गुरु रविदास विश्व महापिठाचे राष्ट्रीय प्रवक्ते तथा राष्ट्रीय चर्मकार संघाचे जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब घोडके, पोलीस पाटील शिवाजी चांदबोधले, शंकर चांदबोधले, भारत घोडके, ध्न्यानेश्वर पवार, राहुल चांदबोधले, छत्रभुज घोडके, राम चांदबोधले, सिद्धार्थ चांदबोधले, मिनिनाथ सोनवळे, बंडू वाघमारे, आकाश चांदबोधले, दत्ता चांदबोधले, दत्ता हवाले, दादाराव इंगळे, संतोष सोनवणे, महादेव सोनवणे, अशोक सोनवणे, बाळासाहेब वाघमारे , दीपक मस्के, कृष्णा कांबळे, जयेश कांबळे आदींनी परिश्रम घेतले.

मोरेवाडी साठवण तलावाच्या

उपलब्धतेचे प्रमाणपत्र मिळाले.मात्र हे काम गेल्या दहा वर्षांपासून प्रलंबित होते. या दहा वर्षाच्या कालावधी नंतर आज प्रत्यक्षात या तलावाचे काम सुरू होत आहे.याचा मनस्वी आनंद होत आहे. या तलावामुळे परिसरातील अनेक शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे.मोरेवाडी ग्रामस्थांची अनेक दिवसापासूनची ही मागणी होती मागील दहा वर्षांमध्ये या कामात कोणतीही प्रगती झालेली नाही.मोरेवाडीला या तलावाच्या भूमिपूजनाच्या अगोदर येणार नाही असे आपण ठरवले होते. अखेर मोरेवाडी साठवण तलावाचे आज भूमिपूजन करण्यात आले आहे.साठवण तलावाने मोरेवाडी ग्रामस्थांच्या अनेक दिवसांचा प्रश्न मार्गी लागणार असून यातून शेतकऱ्यांच्या जीवनात या प्रकल्पामुळे संजीवनी ठरणार हा प्रकल्पातून शेतकऱ्यांचे जीवमान उंचावण्याचे काम या प्रकल्पामुळे होणार आहे.या साठवण तलाव ७ कोटी ६९.६७ लक्ष रुपये खर्च करून या साठवण तलाव तयार होणार होणार आहे.शेतकऱ्यांचा भुसंपादनाचा देखील प्रश्न मार्गी लागणार आहे.यावेळी मोरेवाडी, शेलारवाडी,केरुळ किनी या गावात या गावचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.ह.भ.प. संतोष महाराज मोरे,ह.भ.प.लाड महाराज,ज्येष्ठ पत्रकार प्रफुलभाऊ सहस्रबुद्धे,रामहरी महारनोर,अशोक ढवण,सुनील सूर्यवंशी, सरपंच संजय थोरवे, सरपंच अंकुश गीते, शिवाजी अनारसे, कल्याण काकडे, सुंदरलाल गर्जे, भाऊसाहेब गोंदकर, संजय पवार,नामदेव काकडे, महादेव मोरे, जाकीर शेख, झाकीर शेख,संजय निंबाळकर,पप्पू बांदल,उपसरपंच सय्यद,माऊली फंड, ज्युनिअर इंजि.मुंडे साहेब आदी उपस्थित होते.

प्रतिक कांबळे यांची महाराष्ट्र

संतोषजी मानूरकर यांनी प्रतिक कांबळे यांच्यावर मोठ्या विश्वासाने बीड जिल्हा पत्रकार संघाच्या बीड शहर अध्यक्ष पदाची जिम्मेदारी सोपवली आहे. एवढेच नाहीतर त्यांना जिल्ह्यातील सर्व शहर अध्यक्षांची नियुक्ती करण्यासाठी प्रभारी केले आहे. याबद्दल प्रतिक कांबळे यांचे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्यावतीने अभिनंदन करण्यात आले आहे. याबरोरच प्रतिक कांबळे यांच्यावर बीडच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रातून अभिनंदन शुभेच्छांचा वर्षाव होतो आहे.

दिंद्रुडला पेट्रोल व प्रदुषण

सिस्टीम, रिमोट कंट्रोल, मोबाईल कंट्रोल अशा अनेक ॲडव्हान्स फीचर्स या ई बाईक मध्ये असल्याने दुचाकीस्वारास दुचाकी प्रवासाचा आनंद घेता येणार आहे. दिंद्रुड येथील दिनेश मुसळे व राजेंद्र मुसळे या उद्योजकाने माजलगाव,धारूर, वडवणी व परळी या चार तालुक्यांच्या मध्यवर्ती असलेल्या दिंद्रुड या ठिकाणी शोरूम चालू केल्याने चारही तालुक्यातील जनतेला याचा लाभ मिळणार आहे. शेतकरी शासकीय नोकरदार शाळा महाविद्यालयीन विद्यार्थी व महिलांसाठी वीस हजार रुपयांचा डिस्काउंट दुचाकी खरेदीसाठी देण्यात आल्याचे मुसळे बंधूंनी सांगितले.

छत्रपती संभाजीनगरमध्ये आठवी आर्थिक गणना

संभाजीनगर : उत्पादन, वस्तू आणि सेवांच्या वितरणात असलेल्या आस्थापनांची संख्या, त्यात गुंतलेल्या व्यक्तींची गणना करण्यासाठी आठवी आर्थिक गणना करण्यात येणार आहे. जिल्ह्यात ४ लाख ४१ हजार ४९० कुटुंबांची गणना या अंतर्गत होणार असून १०० कुटुंबांसाठी एक याप्रमाणे प्रगणकांची नेमणूक होणार आहे.

यासंदर्भात जिल्हास्तरीय समन्वय समितीची बैठक नुकतीच पार पडली. निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, जिल्हा सांख्यिकी अधिकारी शिवनाथ साबळे, महिला व बालविकास विभागाचे कार्यक्रम अधिकारी बी. व्ही. सोनवणे, सहा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. रमण इंगळे, जिल्हा रुग्णालयाचे डॉ. महेश लड्ढा, सहा. जिल्हा नियोजन अधिकारी लक्ष्मिकांत थोन्टे, शरद दिवेकर आदी उपस्थित होते.

माहितीनुसार, या गणनेसाठी मोबाईल ॲप्लिकेशन तयार करण्यात आले आहे. त्याद्वारे ही गणना होणार आहे. जिल्ह्यात ४ लाख ४१ हजार ४९० कुटुंबांची गणना होणार आहे. त्यासाठी प्रति १०० कुटुंबास एक या प्रमाणे ४४१६ प्रगणक

यातील ३ प्रकल्पांमागे एक याप्रंआणे अन्य १४९८, तर त्यावरील पर्यवेक्षक ७५२ असे एकूण ६६६६ कर्मचारी ग्रामीण भागासाठी नियुक्त करण्यात येणार आहेत. शहरी भागाकरिता ३५१७ वॉर्डांमध्ये प्रत्येकी एक याप्रमाणे ३५१७ प्रगणक, प्रत्येकी तीन प्रगणकांमागे एक याप्रमाणे ११७५ प्रगणक व ५९१ पर्यवेक्षक असे एकूण ५२११ कर्मचारी नियुक्त करण्यात येणार आहेत. आर्थिक गणना जिल्ह्यात करण्यासाठी जिल्हास्तरीय समन्वय समिती तयार करण्यात आली असून, तालुकास्तरीय समित्याही तयार करण्यात आल्या आहेत.

माहिती संकलित कण्याचा उद्देश

आर्थिक गणनेचे कार्य हे सांख्यिकी माहिती संग्रहण अधिनियम २००८ नुसार केले जाते. १९७७ मध्ये देशातील पहिली आर्थिक गणना झाली होती. त्यानंतर १९८०, १९९०,१९९८,२००५, २०१३, २०१९ अशा सात आर्थिक गणना झाल्या आहेत. आता यंदाची ही आठवी आर्थिक गणना होणार आहे. अर्थव्यवस्थेच्या संरचनेचे मूल्यांकन करण्यासाठी ही आर्थिक गणना केली जाते. त्यात बिगरशेती आर्थिक उपक्रमांचा समावेश असतो. शेती आधारित उपक्रमांसाठी वेगळी गणना केली जाते. यात ग्रामिण, शहरी भागातील आर्थिक उपक्रमांचे स्वरूप, नोंदणीकृत, परवानाधारक, स्वयंरोजगार, हंगामी, प्रासंगिक, बारमाही प्रकल्प त्यात गुंतलेल्या व्यक्ती अशा सगळ्यांची माहिती संकलित केली जाते.

सोप्या पद्धतीने आल्यापासून सुंठेची निर्मिती

शेतकऱ्यांनो आले या पिकापासून प्रक्रिया करून खारे आले, आलेपाक, आल्याचे सरबत, वाळलेले आले आणि आल्याचे लोणचे ,सुंठ इत्यादी पदार्थ बनवले जातात. सुंठ तयार करावयास वापरावयाच्या आले पिकाची काढणी परिपक्व झाल्यानंतर करावी. ते पूर्ण वाढलेले, निरोगी असावे. सुंठीसाठी वापरायचे आले अधिक तंतुमय असू नये. रिओडी जानेरो, माहीम यांसारख्या कमी तंतुमय असणाऱ्या जातींचा वापर करावा. यापासून उत्तम प्रतीची सुंठ तयार होऊन चांगला बाजारभाव मिळतो.

मलबार पद्धती : या पद्धतीत आले स्वच्छ निवडून आठ-दहा तास पाण्यात भिजत ठेवतात.

त्यानंतर त्याची साल काढून दोन टक्के चुन्याच्या द्रावणात सहा-सात तास भिजत ठेवतात. त्यानंतर द्रावणातून काढून हे आले छोट्याशा व बंद खोलीत पसरून ठेवतात. बंद खोलीत आल्याच्या कंदाला १२ तास गंधकाची धुरी देतात. थोडक्यात, बंद खोलीत गंधक जळत ठेवतात. त्यानंतर कंद बाहेर काढून दोन टक्के चुन्याच्या द्रावणात सहा तास भिजत ठेवतात व परत १२ तास गंधकाची धुरी देतात. अशाप्रकारे ही प्रक्रिया तीन वेळा करावी लागते, त्यामुळे आल्याच्या कंदांस पांढराशुभ्र रंग येतो. हे प्रक्रिया केलेले आले सूर्यप्रकाशामध्ये वाळवले जाते व गोणपाटामध्ये घालून स्वच्छ केले जाते. हेच आले सुंठ म्हणून बाजारात पाठविले जाते.सोडा व खास मिश्रण पद्धती : या पद्धतीने सुंठ तयार करण्यासाठी आले सर्वप्रथम स्वच्छ निवडून घ्यावे.

त्यानंतर आठ ते दहा तास पाण्यामध्ये भिजत ठेवून त्याची साल काढून घ्यावी. यानंतर दीड दोन फूट आकाराच्या हाताने उचलेल इतक्या क्षमतेच्या गॅल्व्हनाइज्ड जाळीच्या पिंजऱ्यामध्ये आले भरून घ्यावे. तीन वेगवेगळ्या भांड्यांमध्ये सोडिअम हायड्रॉक्साईड (कॉस्टिक सोडा)ची २० टक्के, २५ टक्के आणि ५० टक्के तीव्रतेची द्रावणे तयार करून उकळून घ्यावीत. या द्रावणांमध्ये कंदाने भिजलेला पिंजरा २० टक्के द्रावणामध्ये पाच मिनिटे, २५ टक्के द्रावणामध्ये एक मिनीट आणि ५० टक्के द्रावणामध्ये अर्धा मिनीट धरावा. त्यानंतर पिंजऱ्यातील आले चार टक्के सायट्रिक ॲसिडच्या द्रावणात दोन तास बुडवून ठेवावे. त्यानंतर चांगले निथळून स्वच्छ सूर्यप्रकाशात वाळत घालावे. चांगले वाळल्यानंतर थोडीफार राहिलेली साल चोळून काढावी. अशा पद्धतीने चांगली सुंठ तयार होते. प्रक्रिया करण्यापूर्वी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे.

जाणून घ्या बीबीएफ लागवड तंत्रज्ञानाचा फायदा

देशाला कृषिप्रधान करणाऱ्या शेतीव्यवस्थेला प्रगतशील करण्यासाठी बी.बी.एफ. पेरणी पद्धत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे कधी अतिवृष्टी तर कधी कोरडा दुष्काळ याचा सामना शेतकरी करत असतात आणि याचाच परिणाम पिकांवर होऊन उत्पादनात घट होते. अशावेळी पडणाऱ्या पावसाचे जास्तीत जास्त पाणी जमिनीत मुरविणे, तसेच अधिक पावसात अतिरिक्त पाणी शेताबाहेर सुरक्षितपणे निचरा करणे, उत्पादन वाढीसाठी रुंद वरंबा सरी लागवड पद्धत फायदेशीर ठरते.

बी.बी.एफ. पेरणी पद्धत म्हणजे काय ? : हे ट्रॅक्टर चलित पेरणी यंत्र असून रुंद वरंबे व सऱ्या पाडणे, पेरणी आणि खते देणे अशी तिन्ही कामे एकाच वेळी केली जातात. यामध्ये दोन फाळ आणि पेरणीचे फण यातील अंतर गरजेनुसार कमी जास्त करता येते. तसेच सऱ्यांची रुंदीही कमी जास्त करता येते. उदा. वरंब्यावर सोयाबीन पिकाच्या ३ ते ४ ओळी ३० सें.मी. किंवा ४५ सें.मी. अंतरावर ३ ओळी घेता येतात. फाळामध्ये तयार होणाऱ्या सऱ्यांची रुंदी ३० ते ४५ सें.मी. गरजेनुसार ठेवता येते. कोरडवाहू शेतीमध्ये जलसंधारणाच्या दृष्टीने बीबीएफ पद्धत अतिशय उपयुक्त आहे. तसेच अधिक व सततच्या पावसामध्ये अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याच्या दृष्टीने बीबीएफ पद्धत उपयोगी आहे. या पद्धतीमुळे सर्वसाधारणपणे २० ते २७ टक्क्यांपर्यंत जलसंधारण तर २५ टक्के उत्पादनात वाढ दिसून आली आहे.

बी.बी.एफ. पेरणी यंत्र अशा प्रकारे फायदेशीर : बीबीएफ पेरणी यंत्राच्या सहाय्याने उतारास आडवी पेरणी केल्यास मुलस्थानी जलसंधारण होते. या पध्दतीत कोरडवाहू शेतीमध्ये जलसंधारणाच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त आहे. पावसाच्या दीर्घकालीन खंड काळात याचा लाभ होतो. अंतरपिक पध्दतीचा अवलंब करून अधिकचे उत्पन्न घेता येते. बीबीएफ पध्दतीने निविष्ठा खर्चात (बियाणे ,खते इ.) २० ते २५% बचत. खत व बियाणे एकाच वेळी पेरल्यामुळे खताचा कार्यक्षम वापर होतो. उत्पन्नामध्ये २५ ते ३०% वाढ होते. वरंब्यावर ओलावा टिकवून ठेवला जात असल्याने पर्जन्यामान खंडाच्या कालावधीत सुध्दा पाण्याचा ताणाची तीव्रता कमी होते. जास्त पर्जन्यमान झाल्यास या पद्धतीमधील सरीमधून अतिरिक्त पाणी वाहून जाण्यास मदत होते. पिकास मुबलक हवा सूर्यप्रकाश मिळाल्याने पिकाची जोमदार वाढ होऊन पीक किड रोगास बळी पडत नाही. पिकामध्ये अंतर मशागत करणे उभ्या पिकांस सरी मधून ट्रॅक्टर/मनुष्य चलीत फवारणी यंत्राव्दारे किटकनाशक फवारणे शक्य होते. या पध्दतीचा अवलंब केल्याने जमिनीची धुप कमी प्रमाणात होऊन सेंद्रीय कर्बाचा हास थांबल्याने जमिनीची जलधारण क्षमता वाढते. या पध्दतीमुळे जमिनीची सच्छीद्रता वाढून जमीन भूसभुसीत होते. परिणामी पिकाची वाढ उत्तम होते. तण नियंत्रण व अंतरमशागतीच्या दृष्टीने ट्रॅक्टरचलित बीबीएफ यंत्राचा वापर करता येतो. यामध्ये पेरणीचे फण काढून तेथे अंतरमशागत आणि तण नियंत्रणासाठी व्ही, आकाराची पास बसविता येते तसेच सरीमध्ये रिजर ठेवून अंतरमशागत होते.

नवजात वासरांमधील अतिसार : लक्षणे आणि उपचार

नवजात वासरांची प्रतिकारशक्ती कमी असल्याकारणाने ते बऱ्याच संसर्गजन्य आजाराने त्रस्त असतात. प्रामुख्याने जुलाब किंवा अतिसार या आजारांचा प्रादुर्भाव जास्त होतो. हा नवजात वासरांमध्ये होणारा अत्यंत महत्त्वाचा आजार असून, वासरू जन्मल्यानंतर पहिल्या १ ते ४ आठवड्यांत या आजाराची लागण जास्त होते.

अतिसार या आजाराची लागण वयाने मोठ्या असणाऱ्या वासरांमध्येही आढळून येते. मात्र त्याचा धोका नवजात वासरांमध्ये अधिक असतो. या आजाराची लागण झाल्यास नवजात वासरू पातळ विष्ठा शरीराबाहेर विसर्जित करते. त्यामुळे वासरांच्या शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी (निर्जलीकरण) होऊन वासरे अशक्त होतात. त्यांची हालचाल मंदावते व ते सुस्त होऊन एकाजागी बसून राहतात. काही वासरे सतत आडवे झोपून राहतात. वेळीच या आजाराकडे लक्ष न दिल्यास वासरांमध्ये मरतुक होण्याची शक्यता असते.

कारणे : जिवाणू, विषाणू आणि परजीवी यांचे संक्रमण. व्यायल्यानंतर पहिले तीन दिवसांचे दूध (चीक) वेळेवर न मिळणे किंवा अपुऱ्या प्रमाणात मिळणे. आहारामध्ये पोषणतत्त्वांची कमतरता. मिल्क रिप्लेसरमध्ये प्रोटीन, फॅट किंवा इतर आवश्यक पोषणतत्त्वांचा अभाव. चारा व पिण्याच्या पाण्याची अपुरी व्यवस्था. आहारात अचानक होणारा बदल. दूषित पाणी किंवा चाऱ्याचे सेवन. थंडी, उष्णता आणि आर्द्रता यासारख्या पर्यावरणीय घटकांमध्ये समतोलाचा अभाव. जास्त थंड आणि उष्ण वातावरणामुळे वासरांचे शरीर कमकुवत होऊन

संसर्गजन्य आजार होण्याची शक्यता वाढते. चयापचन संबंधित बिघाड, श्वसनाचे आजार आणि नाभीचे संसर्ग वासरांच्या आरोग्यावर परिणाम करतात. त्यामुळे वासराची प्रतिकारशक्ती कमकुवत होऊन जुलाब किंवा अतिसाराचा प्रादुर्भाव वाढतो.

लक्षणे : पातळ, पाण्यासारखी किंवा चिकट विष्ठा शरीराबाहेर विसर्जित करणे. हळूहळू पातळ विष्ठेचे रक्तयुक्त विष्ठेमध्ये रूपांतर होते. पातळ आणि रक्तयुक्त विष्ठेमुळे गोठ्यात दुर्गंधी पसरते. विष्ठेचा रंग पांढरा, पिवळसर, हिरवट किंवा रक्तमिश्रित असतो. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी (निर्जलीकरण) होते. त्वचा कोरडी पडते आणि त्वचेवर सुरकुत्या पडतात.

डोळे खोलगट गेलेले दिसतात. भूक मंदावते. दूध पिण्याची इच्छा कमी होते. दूध पिऊनही वासरांच्या शरीरात ऊर्जेचा अभाव जाणवतो. वासरांची वाढ खुंटते आणि रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. वजन कमी होते. शरीरामध्ये सुस्तपणा जाणवतो. वासरांच्या हालचाली मंदावतात. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन वासरे कोमामध्ये जातात. गंभीर अवस्थेत मृत्यू होण्याचा धोका असतो.

निदान : विष्ठा पाणीदार, रक्तमिश्रित, किंवा दुर्गंधीयुक्त असणे. शरीरात पाण्याचे प्रमाण कमी होणे, थकवा जाणवणे. त्वचा कोरडी होणे आणि डोळे खोलगट जाणे या लक्षणांच्या आधारे वासरांमध्ये जुलाब किंवा अतिसाराच्या स्वरूपाचे निदान करता येते. आंतर परजीवीच्या निदानासाठी विष्ठेची चाचणी करणे. संसर्गजन्य रोगांच्या निदानासाठी रक्त तपासणी करणे.

उपचार, प्रतिबंधात्मक उपाय : वासरू जन्मल्यानंतर पहिल्या १ ते २ तासांमध्ये त्याला आईचे दूध (कोलोस्ट्रम) द्यावे. वासराला त्याच्या शारीरिक वजनाच्या १० टक्के प्रमाणात कोलोस्ट्रम (चीक) द्यावे. प्रमाणाबाहेर कोलोस्ट्रम (चीक) देणे टाळावे. वासरांच्या आहारामध्ये योग्य मिल्क रिपलेसरचा समावेश करावा. वासरांचा आहार हा संतुलित आणि सुलभ पचणारा असावा. पशुवैद्यकाच्या मदतीने वासराला इलेक्ट्रोलाइट्स आणि नॉर्मल सलाइन द्यावी. जेणेकरून त्याच्या शरीरातील पाण्याचे प्रमाण राखता येते. पशुवैद्यकाच्या सल्ल्याने आवश्यक ते उपचार करावे. गोठा स्वच्छ आणि कोरडा ठेवावा. वासरांच्या गोठ्यातील घाण, ओलसरपणा आणि दुर्गंधी साफ करावी. आजारी वासरांना निरोगी वासरांपासून वेगळे करणे. वासरांना नियमित जंतनाशक औषधे द्यावीत.

दिन विशेष

जागतिक दिवस: जागतिक नागरी संरक्षण दिवस बोस्निया व हेर्झेगोविनाचा स्वातंत्र्यदिन

महत्वाच्या घटना

- १५६५ : रिओ डी जानिरो शहराची स्थापना झाली.
- १८१८ : सिंहगड किल्ला इंग्रजांनी ताब्यात घेतला.
- १८७२ : 'यलो स्टोन नॅशनल पार्क' या जगातील पहिल्या राष्ट्रीय उद्यानाची स्थापना झाली.
- १८९३ : अभियंते निकोला टेस्ला यांनी पहिल्या रेडिओ चे प्रात्यक्षिक दाखवले.
- १८९६ : हेन्री बॅक्करल अणुकिरणोत्सर्जीचे किरणे शोधले.
- १९०७ : टाटा आर्यन ॲन्ड स्टील कंपनीची स्थापना
- १९१९ : रॉलट ॲक्ट निषेधार्थ महात्मा गांधी यांनी सत्याग्रहाला रारंभ केला.
- १९२३ : आजच्या दिवशी ग्रीसांनी ग्रेगोरियन कॅलेंडर ला स्वीकारले.
- १९२७ : रत्नागिरीस गांधीजींनी सावरकरांची भेट घेउन चर्चा केली.
- १९३६ : अमेरिकेतील महाकाय 'हूव्हर धरण' बांधून पूर्ण झाले.
- १९४६ : 'बँक ऑफ इंग्लंड'चे राष्ट्रीयीकरण झाले.
- १९४७ : आंतरराष्ट्रीय नाणे निधिच्या कामकाजास सुरूवात झाली.
- १९४८ : गुवाहाटी उच्च न्यायालयाची स्थापना
- १९५४ : प्रशांत महासागरातील बिकिनी अटोल येथे अमेरिकेने हायड्रोजन बॉम्बची दुसरी चाचणी घेतली. हा स्फोट हिरोशिमाच्या स्फोटापेक्षा ६०० पट जास्त शक्तिशाली होता. तो दिवसासुद्धा १५० किलोमीटर पेक्षा जास्त दूरवर दिसला. या स्फोटामुळे आसपासच्या भागात प्रचंड प्रमाणात किरणोत्सर्ग झाला.
- १९५८ : कोयना जलविद्युत प्रकल्पाच्या उभारणीस सुरुवात
- १९६१ : अमेरिकेचे अध्यक्ष जॉन एफ केनेडी यांनी पीस कॉर्पस स्थापन करते.
- १९६१ : युगांडा मध्ये लोकशाही गणतंत्र सुरु होऊन पहिल्या निवडणुकी झाल्या.
- १९९२ : बोस्निया व हेर्झेगोविनाला युगोस्लाव्हियापासून स्वातंत्र्य मिळाले.
- १९९८ : दाक्षिणात्य गायिका एम. एस. सुब्बलक्ष्मी यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान करण्यात आला.
- २००९ : राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांनी नवीन चावला यांना देशाचे निवडणूक आयुक्त बनविण्याची घोषणा केली.
- २०१० : आजच्या दिवशी भारताच्या हॉकी संघाने पाकिस्तान च्या संघाला ४-१ ने हरविली.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

- १९१७ : प्रसिद्ध हिंदी करतार सिंह दुग्गल यांचा जन्म.
- १९१९ : भारतीय अर्थशास्त्रज्ञ पृथ्वी नाथ धर यांचा जन्म.
- १९२२ : यित्झॅक राबिन - इस्त्रायलचे ५ वे पंतप्रधान, संरक्षणमंत्री आणि नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: ४ नोव्हेंबर १९९५)
- १९२२ : महाराष्ट्र भूषण पुरस्कार लाभणारे आधुनिक महामानव डॉ. नारायण विष्णू तथा नानासाहेब धर्माधिकारी यांचा अलिबाग, रायगड येथे जन्म.
- १९३० : राम प्रसाद गोएंका - उद्योगपती (मृत्यू: १४ एप्रिल २०१३)
- १९४४ : पश्चिम बंगाल चे माजी मुख्यमंत्री बुद्धदेव भट्टाचार्य यांचा जन्म.
- १९५१ : बिहार चे मुख्यमंत्री नितीश कुमार यांचा जन्म.
- १९६८ : सलील अंकोला - क्रिकेटपटू
- १९६८ : आजच्या दिवशी भारतीय वेटलिफ्टर कुंजारानी देवी यांचा जन्म.
- १९७७ : पाकिस्तानी क्रिकेट खेळाडू शहीद आफ्रिदी यांचा जन्म.
- १९८० : शाहिद अफ्रिदी - पाकिस्तानी क्रिकेटपटू
- १९८३ : भारतीय बॉक्सर मेरी कॉम यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

- १९५५ : नारायण सदाशिव मराठे तथा 'केवलानंद सरस्वती' - महाराष्ट्रातील धर्मसुधारणावादी श्रेष्ठ संस्कृत पंडित, संस्कृतमीमांसाकोशाचे संपादक (जन्म: ८ डिसेंबर १८७७)
- १९८८ : हिंदी भाषेतील कवी सोहनलाल द्विवेदी यांचे निधन.
- १९८९ : वसंतदादा पाटील - महाराष्ट्राचे ५ वे व ९ वे मुख्यमंत्री, सहकारी साखर कारखानदारीचे आधारस्तंभ (जन्म: १३ नोव्हेंबर १९१७)
- १९९४ : निर्माते, दिग्दर्शक मनमोहन देसाई यांनी आत्महत्या केली (जन्म: २६ फेब्रुवारी १९३७)
- १९९४ : महाराष्ट्राचे शिल्पकार वसंतराव दादा पाटील यांचे निधन
- १९९९ : दत्तात्रयशास्त्री धुंडिराज तथा 'दत्तमहाराज' कवीश्वर - वेदविद्येचे आणि संस्कृतचे गाढे अभ्यासक, वेदांती पंडित (जन्म: १३ फेब्रुवारी १९१०) गौरी देशपांडे कादंबरीकार, लघुकथालेखिका आणि कवयित्री-..गौरी देशपांडे कादंबरीकार, लघुकथालेखिका आणि कवयित्री
- २००३ : गौरी देशपांडे - कादंबरीकार, लघुकथालेखिका आणि कवयित्री (जन्म: ११ फेब्रुवारी १९४२)
- २०१७ : आजच्या दिवशी विनोदी लेखक तारक मेहता यांचे निधन.

जिल्हास्तरीय उपविभागीय स्तरीय संनियंत्रण समित्या कागदावर

पिडीत शेतकऱ्यांना वाली कोण? त्यांना न्याय कोण देणार?

बीड । प्रतिनिधी

पोलिस अधीक्षक नवनित कांवत यांनी सौर ऊर्जा प्रकल्प व पवन ऊर्जा प्रकल्पाच्या कामकाजाच्या संबंधाने स्थानिक राजकीय पुढारी, स्थानिक शेतकरी व गावगुंड यांच्याकडून विविध कारणांसाठी होणारी अडवणूक करून कामकाज बंद पाडणे किंवा खंडणीची मागणी करणे या अनुषंगाने प्रकल्पातील अशा होणाऱ्या घटनांना आळा घालण्यासाठी नोडल अधिकारी यांची नियुक्ती केली आहे. मात्र पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांची होणारी फसवणूक व दडपशाही याविरोधात शेतकऱ्यांनी शासन दरबारी लेखी तक्रार करून दाद मागण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर गुन्हे दाखल होतात. जिल्हा प्रशासन त्यांची बाजु मुळात ऐकुनच घेत नाही. सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या बाबतीत बालाघाटावर अशा घटना घडलेल्या आहेत. यातच बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील महाराष्ट्र शासनाचा वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांवर पवनचक्की कंपन्यांनी खोटा गुन्हा दाखल केला असुन त्यांना न्याय कधी मिळणार?? पोलिस प्रशासन पवनचक्की कंपन्यांचीच केवळ

पाठराखण करत असुन पिडीत शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली आहे.

बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील शेतकरी गणेश जगदाळे सांगतात आम्ही ७ जण भावंडे एकत्र कुटुंब पद्धतीत असुन आमच्या शेतालगत ९०० फुट अंतरावर फसवणूक करून पवनचक्की उभारण्यात आली आहे. अगोदर आम्हाला सौर ऊर्जा प्रकल्पाच्या प्लेटी लावणार असल्याचे सांगण्यात आले.नंतर रात्रीतुन मोठमोठ्या वाहनातुन पवनचक्की साहित्य आणण्यात आले.आम्ही अडवण्याचा प्रयत्न केला असता आमच्यावर पोलिस प्रशासनाकडून गुन्हे दाखल करण्यात आले. पवनचक्की कंपन्यांच्या कापर तारांमुळे जमिनीतील पाण्याची पातळी घटली. आमच्या शेतात सध्या शंभरच्या वर दुधदुभते जनावरे आहेत. पवनचक्की सुरू झाल्यावर आम्हाला सगळं सोडून जायची पाळी येणार आहे. आम्हाला सन २०१३ मध्ये महाराष्ट्र शासन कृषी व पणन विभाग सन्मानपत्र वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार मिळालेला आहे.

गेल्या महिन्यात १३ जानेवारी दरम्यान बीड जिल्ह्यातील प्रगतशील शेतकरी असणाऱ्या ७ जणांना पुणे येथे नेण्यात आले होते.त्यात आमचा समावेश होता. मात्र पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभारामुळे आम्ही अडचणीत आलो असुन जिल्हा प्रशासन व न्यायालयात दाद मागत आहोत. आम्हाला न्याय कधी मिळणार?

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा आणि कामगार विभागाने दि.२१ आक्टोबर २०१३ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय नियंत्रण समित्यांची स्थापना केलेली आहे. या समित्यांना पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहाराबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासणे तसेच पवन ऊर्जा प्रकल्पाचे निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यावहारिक व मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे पवन ऊर्जा प्रकल्प बाबत समितीकडे आलेल्या तक्रारीची चौकशी करून त्यावर योग्य ती कारवाई करणे. आणि जिल्ह्यातील पवन ऊर्जा प्रकल्पाचे अनुषंगाने उद्धवणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे. त्याचप्रमाणे शेतजमीन मालक ,शेतकरी आणि ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासात यांच्यामध्ये समन्वय ठेवणे. प्रकल्प उभारणीसाठी व प्रकल्प कार्यरत राहण्यासाठी स्थानिक स्तरावर सर्व प्रकारचे सहकारी सहाय्य करणे इत्यादी अधिकार त्यांना दिलेले आहेत. पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत तर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद आणि पोलीस अधीक्षक हे सदस्य आहेत. त्याचप्रमाणे तालुका स्तरावर सनियंत्रण समितीमध्ये उपविभागीय अधिकारी अध्यक्ष तर तहसीलदार समन्वयक अथवा सचिव आहेत .मात्र या समित्या केवळ कागदावर असून पवन ऊर्जा प्रकल्प संदर्भात शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे जिल्हा प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप शेतकरी करत आहेत.

असे असतानाच पोलीस अधीक्षक बीड यांनी पवनचक्की व सौर ऊर्जा प्रकल्प अधिकाऱ्यांची पाठराखण करणे म्हणजे एक प्रकारे त्यांच्या मनमानी कारभाराला दिलेले सूट असून पिडीत शेतकऱ्यांना न्याय कोण देणार? पीडित शेतकऱ्यांचे तक्रारी कोण ऐकणार ? असा सर्वात सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

सर्वानुमते ठरणार कार्यक्रमांची रुपरेषा

बैठक:जयभिम महोत्सवाच्या समित्या जाहीर

बीड । प्रतिनिधी

बीडचा जयभिम महोत्सव इतरांसाठी आदर्श ठरला आहे.एकूण चौदा दिवस चालणार हा जयभिम महोत्सव आंबेडकरी समाज स्वबळावर साजरा करतो.त्या कालावधित अनेक उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. त्या अनुषंगाने जयभिम महोत्सवाच्या विविध समित्या ठरविण्यात आल्या आहेत. त्यामुळे यंदाचीही महोत्सव तेवढ्याच दिमाखदार उपक्रमांनी साजरा होणार आहे. अशी माहिती डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांनी बैठकीत दिली.

बीड शहरातील तुलसी संगणक शास्त्र महाविद्यालय येथे गुरुवार (दि.२७) रोजी समित्या निवडीसाठी महत्वपूर्ण बैठक घेण्यात आली होती. सदरील बैठक डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे मार्गदर्शक तथा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पु कागदे, तसेच जयभिम महोत्सवाचे प्रमुख प्रा.प्रदीप रोडे, गौतम चोपडे या दोघांच्या प्रमुख

उपस्थितीत घेण्यात आली होती.भारतीय संविधान निर्मिति डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली आहे. त्यासाठी विविध समित्या बैठकीत जाहीर करण्यात आल्या.त्यामध्ये नियोजन समिती, धम्मदेसना समिती,महापुरुष सामान्य ज्ञान, व्याख्यान, नृत्य स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, महिला स्पर्धा समिती, प्रसिद्धी समिती,भिमगित गायन आदी समित्या सर्वानुमते ठरविण्यात आल्या.डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून समित्या ठरविण्यात आलेल्या आहेत. कार्यक्रमांची रूपरेषा ठरविण्यासाठी समितीने सुचित केलेल्या सूचनांवर एकमत होऊन कार्यक्रमांची मांडणी आणि नावे निश्चित केली जाणार आहेत.

मी पण प्रभु श्रीरामाचा भक्त- खा.सोनवणे

रामगड संस्थान हे सर्वसामान्य भक्ताचे आशास्थान- राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

सौंदाना ता.बीड येथे श्री क्षेत्र रामगडाचा वार्षिक सप्ताहाची सांगता महंत श्री स्वामी योगीराज महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने संपन्न झाली,यावेळी बीड जिल्ह्याचे खा. बजरंग बप्पा सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के उपस्थित होते.

या सप्ताहासाठी सौंदाना परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी गावकऱ्यांसोबत संवाद साधताना म्हणाले की मी या गावांच्या व परिसरातील नागरिकांच्या आशीर्वादाने मी बीड चा खासदार झालो आहे.बीडच्या जनतेने मला खूप प्रेम दिलं आता माझी परीक्षा आहे, मतदार सर्वसामान्य व नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी रात्रीचे दिवस करणारा पण सामान्य माणसावर अन्याय

होऊ देणार नाही. मी पण महाराज रामाचा भक्त बजरंग आहे. त्यामुळे मी कोणालाच घाबरत नाही असे उद्गार बजरंग सोनवणे यांनी काढले. यावेळी राजेंद्र मस्के असे म्हणाले की श्री क्षेत्र रामगड हे संस्थान सर्वसामान्य भक्ताचे आशास्थान आहे, महंत श्री योगीराज महाराज यांच्या नेतृत्वात खाली गडाचा विकास होत आहे. भक्तांचे देखील योगदान मोठ्या प्रमाणात आहे जो भक्त रामगडाची निष्ठा ठेवतो त्याला कधीच काही कमी पडत नाही. असे मत जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केले. यावेळी पिंटू ठोंबरे, दुशंत डोंगरे ,परमेश्वर तळेकर, कथले सर,संपत कुटुळे सह या परिसरातील सरपंच उपसरपंच गावकरी,महिला भगिनी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सामान्य ज्ञान स्पर्धाचा बक्षीस वितरण सोहळा

बीड । प्रतिनिधी

शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालयामधील छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती निमित्त सामान्य स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेकरिता बीड मधील नामांकित शाळाना निमंत्रित करण्यात आले होते. या स्पर्धेकरिता इयत्ता ५ वी ते ७ वी व इयत्ता ८ वी ते १० वी असे दोन गट करण्यात आले. सर्व शाळाकडून चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळाला, जवळपास ५०० मुलांनी ही परीक्षा दिली होती.

इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये प्रथम पारितोषिक रु. ५००० चि. बागल अनुजा विठ्ठल, सरस्वती

विद्यालय, बीड व्दितीय पारितोषिक रु. ३००० चि. मस्के पार्थ नानासाहेब, चंपावती विद्यालय, बीड, चि. गिरे सुचि युवराज, के.एस.पी. विद्यालय, बीड तृतीय पारितोषिक रु. १००० चि. अंकुशे आराध्य अरुण, के.एस.पी. विद्यालय, बीड यांनी पटकवले. तसेच इयत्ता ८ वी ते १० वी प्रथम पारितोषिक रु. ५००० चि.मस्के विपुल नानासाहेब, चंपावती विद्यालय, बीड व्दितीय पारितोषिक रु. ३००० चि. जावळे वैष्णवी रामदास, के.एस.पी. विद्यालय, बीड तृतीय पारितोषिक रु. १००० चि. शिंदे अभिषेक, के.एस.पी. विद्यालय, बीड यांनी पटकवले. या कार्यक्रमास बक्षीस वितरण करण्याकरिता प्रमुख उपस्थिती श्री. अनिलदादा जगताप, शिवसेना प्रमुख बीड जिल्हा यांची उपस्थिती लाभली. श्री. अनिलदादा जगताप यांनी मुलांचे कौतुक करुन मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख हे या कार्यक्रमास उपस्थित होते. संस्थाध्यक्षा सौ.अंजलीताई शेळके, तसेच शाळेतील प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर, श्री गाडेकर सर, व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी उपस्थितीत बक्षीस वितरण सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

सोमवारी लोकशाही दिन

बीड। प्रतिनिधी

जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दिनांक ३ मार्च २०२५ रोजी सकाळी १०-०० ते दुपारी १२-०० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे. लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा.

लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत.

सोलर पोल हायमस्ट दिवे बसवण्यात शहरात मोठा भ्रष्टाचार-अक्षय कोकाटे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र सुवर्ण जयंती शहरी नगरोत्थान महाअभियाने व दलितवस्ती योजनेच्या सोलर पोल हायमास्ट दिवे बसविण्याच्या योजनेत संबंधीताकडून निकृष्ट दर्जाचे साहीत्य वापरून भष्ट्राचार केला आहे.त्या प्रकरणी बीड नगरपालिका सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करावी या मागणीसाठी रिपाईचे अक्षय कोकाटे यांनी बीड जिल्हाधिकारी यांच्याकडे थेट निवेदनाद्वारे तक्रार केली आहे.

बीड नगर परिषदेच्यावतीने नगरोत्थान अभियान व दलितवस्ती योजने अंतर्गत सोलार पोल हायमास्ट दिवे बीड शहरातील विविध भागामध्ये बसविण्यासाठी ५ कोटी २५ लाख रु मान्यता देण्यात आली असुन दलित वस्त्यामध्ये सोलर पोल हायमास्ट दिवे बसविण्यासाठी १ कोटी उपायाची मान्यता देण्यात आली आहे. या दोन्ही योजनेत अधिकाऱ्यांच्या संगनमताने ज्या मध्ये न.प. अभियंता उदय ई पिल्ले व मा.मुख्याधिकारी न.प.बीड यांच्या मोहीनीराज - कन्ट्रक्शन व संदिप इलेक्ट्रिकल यांच्या मार्फत दलितवस्ती योजने मधून कामे करुयात येत असून नगरोत्थान महाअभियान मार्फत साबेर कन्ट्रक्शन पाटोदा यांच्या कडून सोलर पोल हायमास्ट दिवे बसविण्याची कामे करण्यत येत आहेत. दोन्ही योजनेतील कामात बसवण्यात आलेल्या पोलची अंदाजित रक्कम व प्रत्यक्ष बसवण्यात आलेल्या पोलची रक्कम या मध्ये भष्ट्राचार झालेला असून निकृष्ट दर्जाचे साहीत्य संबंधीत एजन्सीकडून वापरून संगनमताने करोडो रुपायाचा भ्रष्टटाचार केला आहे. या प्रकरणातील अभियंता, न.प.मुख्याधिकारी व संबंधीत कामे करणाऱ्या कंट्रक्शनची निपक्षपाती पणे चौकशी करून या दोन्ही योजनेची कामे करणाऱ्या कन्ट्रक्शन वर संगनमताने भ्रष्टाचार करीत निकृष्टदर्जाचे साहित्य वापरून शासनाची फसवणूक केल्याबद्दल गुन्हे नोंद करण्यात यावेत. व त्यांची मान्यता रद्द करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे. याप्रसंगी.रिपाईचे शहर सचिव अक्षय कोकाटे, युवा शहराध्यक्ष भैय्यासाहेब मस्के,धम्मा पारवे आदीं उपस्थित होते.

जाहिर प्रगटन

मा.श्री. ओ.एन. मंत्री साहेब, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज ३६७/२०२५

पद्मीन भ्र. नामदेव माने व ईतर विरूध्द निरंक

अर्जदार : १ पद्मीन भ्र. नामदेव माने, वय ६६ वर्षे, धंदा घरकाम, रा. चन्हाटा, ता.जि. बीड, २. पांडूरंग पि. नामदेव माने, वय ४७ वर्षे, धंदा नौकरी, रा. शिवाजी नगर, पोलिस लाईन, मॉडर्न कॉलेज, पुणे शहर, ता.जि. पुणे, ३. राही भ्र. अंकुश वाघमारे, वय ५१ वर्षे, धंदा घरकाम, रा. एल.एम. रोड, एल. बी.एस. नगर, कांडर पाडा, दहिसर पश्चिम मुंबई, ४. गयाबाई पि. नामदेव माने, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा. खापर पांगरी, ता.जि. बीड ५. प्रयागाबाई भ्र. परमेश्वर शेटे, वय ४१ वर्षे, धंदा घरकाम, रा. शिवाजी नगर, तिर्थपुरी, ता. घनसांगवी, जि. जालना, ६. रूखमीन भ्र. नवनाथ चहाटकर, वय ६० वर्षे, धंदा घरकाम, रा. लिंबारूई, ता.जि.बीड ७. विठ्ठल पि. नामदेव माने (मयत) वारस ७ अ. सविता भ्र. विठ्ठल माने, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. चहटा, ता.जि. बीड ७ ब. गणेश पि. विठ्ठल माने, वय ३२ वर्षे, धंदा शेती, रा. चव्हाटा, ता.जि. बीड ७ क. स्वामिनाथ पि. विठ्ठल माने, वय २७ वर्षे, धंदा शेती, रा. चव्हाटा, ता.जि. बीड विरुध्द निरंक मागणी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामदेव गणपती माने, यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत नामदेव गणपती माने, यांचा मृत्यु दिनांक १२/०४/२०२१ रोजी झाला आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत नामदेव गणपती माने, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत नामदेव गणपती माने, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/१०/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०५/०४/२०२५ आहे.

स्वाक्षरित
क लिपीक

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

जाहिर प्रगटन

ॲड, ठोसर ए.एस.मा. श्रीमती पी डी चव्हाण ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज ३५९/२०२५

अनुसया भ्र. सातेराम सपकाळ व इतर व इतर विरुध्द निरंक

अर्जदार :- १ . अनुसया भ्र. सातेराम सपकाळ, वय-२९, वर्षे, धंदा-घरकाम, रा. कोल्हारवाडी, ता. जि. बीड २. समृध्दी पि. सातेराम सपकाळ, वय-१२, वर्षे, धंदा-शिक्षण, रा. कोल्हारवाडी, ता. जि. बीड ३. सार्थक पि. सातेराम सपकाळ, वय-१०, वर्षे, धंदा-शिक्षण, रा. कोल्हारवाडी, ता. जि. बीड ४. संकेत पि. सातेराम सपकाळ, वय-०८, वर्षे, धंदा-शिक्षण, रा. कोल्हारवाडी, ता. जि. बीड ५. मोहिबाई भ्र. विष्णु सपकाळ, वय-७०, वर्षे, धंदा-घरकाम, रा. कोल्हारवाडी, ता. जि. बीड ६. विष्णु पि. संतराम सपकाळ, वय-८०, वर्षे, धंदा-शेती, रा. कोल्हारवाडी, ता. जि. बीड (अर्जदार हे भारतीय आहेत)

विरुध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत सातेयम पि. विष्णु सपकाळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी सातेयम पि. विष्णु सपकाळ यांचा मृत्यु दिनांक ०४.०८.२०२४ रोजी मौजे कोल्हारवाडी, ता. जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क २ हि मयताची मुलगी असुन अर्जदार क ३ व ४ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क ५ ही मयताची आई तर अर्जदार क. ६ हे मयताचे वडील आहेत. हे मयताचे कायदेशीर वारस आहे. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरह अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत सातेराम पि. विष्णु सपकाळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक २८ फेब्रुवारी २०२५ गंजी माइया सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०३ एप्रिल २०२५.

स्वाक्षरित
क लिपीक

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

जाहिर प्रगटन

मा.श्री ओ.एन. मंत्री साहेब, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज ३३७/२०२५

संतोष बाबासाहेब शेळके, विरूध्द निरंक

अर्जदार : १. संतोष बाबासाहेब शेळके, वय ३६ वर्षे, धंदा शेती रा. म्हाळसजवळा, ता.जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे वावत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत बाबासाहेब पि. गैबी शेळके, यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी मयत बाबासाहेब पि. गैबी शेळके, यांचा मृत्यु दिनांक १३/०३/२०२० रोजी झाल आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत बाबासाहेब पि. गैबी शेळके, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत बाबासाहेब पि. गैबी शेळके, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/०२/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २८/०३/२०२५ आहे.

स्वाक्षरित
क लिपीक

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

के.एस.पी विद्यालयामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात

बीड । प्रतिनिधी

शहरातील के.एस.पी विद्यालय येथे राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमा करिता शाळेमध्ये विज्ञान प्रदर्शन भरवण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी विविध प्रयोग करुन प्रदर्शन भरवले. सर्वांना भरवलेल्या प्रदर्शनातील प्रयोगाबदल माहीती सांगण्यात आली, त्या प्रयोगाचा हेतू, उपयोग मुलांना समजावून सांगण्यात आले. वैज्ञानिक ज्ञान आणि नवनिर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी हा राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला. राष्ट्रीय विज्ञान दिन दरवर्षी २८ फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो. हा दिवस १९२८ मध्ये भारतीय शास्त्रज्ञ सीव्ही रमण यांनी रमन इफेक्टचा शोध लावला होता. या शोधाबद्दल सीव्ही रमण यांना १९३० मध्ये भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक देण्यात आले.

यावेळी या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख यांनी मुलांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमास संस्थाध्यक्षा सौ.अंजलीताई शेळके मॅडम, तसेच शाळेतील प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर, विज्ञान शिक्षक श्री. गाडेकर सर, श्री अनपट सर, श्री. तुपे सर, श्री. जेठे सर, श्रीमती ढाकणे मॅडम व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी उपस्थितीत राष्ट्रीय विज्ञान दिन जयंती साजरा करण्यात आली.

सामाजिक सलोखा राखण्यासाठी महिला दिनी मसाजोग ते बीड सद्भावना पदयात्रा

पदयात्रेत सहभागी होण्याचे राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

सध्या बीड जिल्ह्यातील सामाजिक सलोखा बिघडला असून हा सामाजिक सलोखा पुन्हा पूर्ववत करण्यासाठी, बंधुभाव वाढवण्यासाठी, महाराष्ट्र धर्म जागवण्यासाठी येत्या महिला दिनी आठ मार्चला मसाजोग ते बीड अशी सद्भावना यात्रा काढण्यात येणार असून या यात्रेत सहभागी होण्याचे आवाहन राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी केले आहे. या सद्भावना यात्रेत राष्ट्रीय काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ सहभागी होणार असल्याची माहिती राहुल सोनवणे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली .यावेळी राष्ट्रीय काँग्रेसचे नेते नवनाथ थोटे ,डॉ.भागवत मोटे, तालुका अध्यक्ष गणेश बजगुडे यांची उपस्थिती होती.

वातावरण नेत्यांनीच बिघडवले

जिल्ह्यातील वातावरण हे नागरिकांनी नव्हे तर नेत्यांनी बिघडवले असा आरोप करत राहुल सोनवणे यांनी हे वातावरण सुरळीत करण्याची जबाबदारीही आता नेत्यांचीच असल्याचे मत व्यक्त केले.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे म्हणाले की आठ मार्चला ही सद्भावना रॅली मस्साजोग येथून ८ मार्च रोजी निघणार असून दिनांक सात मार्चला राष्ट्रीय काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ बीड जिल्ह्यात येत असून ते नारायणगड, भगवानगड या ठिकाणी सामाजिक सुलोख्यासाठी साकडे घालतील. त्यानंतर ते इन्फंट इंडिया या ठिकाणी मुक्कामाला थांबतील. ५१ किलोमीटर अंतर असलेल्या या रॅलीमध्ये सामाजिक संघटनांनी ही सहभागी व्हावे असे आवाहन राहुल सोनवणे यांनी केले. ५१ किलोमीटर अंतर असलेली ही रॅली दोन दिवस चालणार आहे. पहिला मुक्काम नेकनूर येथील बंकट स्वामी मठामध्ये होणार आहे. जातीय तेढ मिटवण्यासाठी आणि बंधुभाव वाढवण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व काँग्रेसचे प्रमुख पदाधिकारी या रॅलीत सहभागी होणार आहेत. जिल्ह्यातील स्त्रीभ्रूणहत्या थांबवावी यासाठी महिला दिनानिमित्त शाहू- फुले -आंबेडकरांच्या महाराष्ट्रामध्ये आणि संत परंपरा असलेल्या या पुरोगामी महाराष्ट्रात आज काय चाललंय असा सर्वांनाच प्रश्न पडत आहे .या या पदयात्रेमध्ये सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी, सामाजिक संघटनांनी, पत्रकार, वकील ,डॉक्टर, व्यापारी, विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन करत असतानाच पहिल्या दिवशी मसाज येथे ७ ०० कार्यकर्ते उपस्थित असतील आणि पुढे ही संख्या वाढेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या रॅलीचा समारोप बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहामध्ये होणार आहे. दुसऱ्या दिवशी दुपारचा विसावा पाली येथे होणार आहे. या पदयात्रेचा समारोप दिनांक नऊ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात होणार असल्याची माहिती राहुल सोनवणे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या पदयात्रेमध्ये संतोष देशमुख यांची कन्या वैभवी आणि त्यांचा भाऊही सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले. याचवेळी राहुल सोनवणे यांनी हे वातावरण नागरिकांनी बिघडले नाही तर नेत्यांनी बिघडवले असा आरोप ही केला. या रॅली नंतर जिल्ह्यातील वातावरण सुरळीत व्हायला मदत होईल असेही राहुल सोनवणे म्हणाले.

हरेवाडी येथे रानडुकराच्या हल्यात तीन महिला जखमी

आष्टी । प्रतिनिधी

रानडुकराच्या हल्ल्यात तीन महिला जखमी आष्टी तालुक्यातील हरेवाडी मराठवाडी,पिंपळगाव घाट परिसरात रानडुकराचा हैदोस हरेवाडी येथील येथील घराजवळील शेतात दि.२७ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजता कांदे कापीत असताना रानडुकरांनी त्या महिलावर वर हल्ला केला हल्ल्यात तीन महिला जखमी झाल्या मंदाबाई दत्तू मराठे,विमल जाधव, सुमनबाई मराठे यामध्ये दोन महिला किरकोळ जखमी झाल्या मंदाबाई दत्तू मराठे महिलेस सिविल हॉस्पिटल अहमदनगर येथे उपचार घेत आहे तिच्या गालावर व छातीला जास्त मार लागला ही बातमी वन विभागाला कळवल्यानंतर आज दि.२८ फेब्रुवारी पंचनामा करण्यात आला.ही घटना हरेवाडी शिवारातऔटे वस्ती जवळ घडली पंचनामा करतावेळी मोहन मराठे,जे.बी. औटे,दादा मराठे, बाळू मराठे, दत्तू मराठे हरेवाडीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

प्रतिक कांबळे यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड शहर अध्यक्षपदी नियुक्ती!

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हा शाखेने पत्रकार संघ अध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतजी मुंडे आणि राज्य समन्वयक संतोषजी मानूरकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या बीड जिल्हा पत्रकार संघाच्या बीड शहर अध्यक्षपदी प्रतिक कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली असून जिल्ह्यातील सर्व शहर अध्यक्षांची नियुक्ती करण्यासाठी त्यांना प्रभारी करण्यात आले आहे. प्रतिक कांबळे हे बीड पत्रकारितेमध्ये नवनिर्वाचित पत्रकार असून त्यांनी आपल्या प्रगल्भ लेखिनेने अल्पवाधीतच वाचकांना आकर्षित केले आहे. याबरोबरच

प्रतिक कांबळे हे बीडच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाने गाजलेले व्यक्तिमत्व आहे. याच सर्व बाबींचा विचार करून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतजी मुंडे आणि राज्य समन्वयक

◀◀ पान ३ वर

पिंपळवंडी येथील महामार्गालगत अतिक्रमण काढण्यात व्यवसायिकांनी केली सुरुवात

पिंपळवंडी । प्रतिनिधी

रहदारीस अडथळा ठरत असलेल्या बीड-अहिल्यानगर या महामार्गावरील हातोला ते लिंबादेवी फाटा दरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने दोन्ही साईडचे रस्त्याच्या मध्यापासून दोन्ही बाजूचे दहा मीटर अंतरावरील जे काही अतिक्रमणे झाली असून ती अतिक्रमणे हटविण्याची मोहीम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने राबविली जात आहे.या मार्गावरील रस्त्याजवळील

अतिक्रमणे संबंधितानी त्यांनी स्वतःहून दोन दिवसात काढावीत असे आवाहन संबंधित विभागाकडून करण्यात आलेले आहे.त्याची दखल घेऊन शासनाच्या अतिक्रमणाचा हातोडा पडण्याअगोदरच पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी-अंमळनेर व अन्य गावातील व्यावसायिक व व्यापारी रस्त्यावरील आलेले अतिक्रमण स्वतःहून काढीत आसल्याचे या मार्गावर सर्वत्र चित्र पहावयास मिळत आहे.

◀◀ पान ३ वर

शासकीय अध्यापक विद्यालयात मराठी राजभाषा गौरवदिन मोठ्या उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

शासकीय अध्यापक विद्यालय नेकनूर येथे मराठी राजभाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमाचे आयोजन डी. एल. एड दृतिय वर्ष उर्दू माध्यमाच्या मराठी मंडळाच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाच्या विविध घटकांमध्ये मराठी भाषेच्या महत्त्वाची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात कुराण शरीफच्या वाचनाने झाली, जे शेख जवेरिया यांनी सादर केले. यानंतर

प्रार्थना सय्यद अक्सा यांनी केली, जी वातावरणात आध्यात्मिक ऊर्जा आणत होती. कार्यक्रमाची प्रस्तावना पठाण सभा यांनी केली, ज्यात मराठी राजभाषेच्या महत्त्वावर भर देण्यात आला.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या भागात, छात्राअद्यापिका यांनी विविध साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यामध्ये मराठी भाषेच्या गीतांचा समावेश होता, तसेच मराठी साहित्यावर विचारवंत भाषणे करण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपापले विचार व्यक्त करत, मराठी भाषेच्या वापरावर जोर दिला.यंदाच्या मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.पारंपारिक वेशभूषा स्पर्धा: या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मराठी पारंपारिक वेशभूषा परिधान केली होती,

◀◀ पान ३ वर

संत रविदासांनी संपूर्ण आयुष्य विषमतावादी समाजव्यवस्था बदलण्यासाठी खर्ची घातले -डॉ.ओमप्रकाश शेटे

दिंद्रुड । प्रतिनिधी

संत रविदासांनी संपूर्ण आयुष्य जातींवर आधारलेली विषमतावादी समाजव्यवस्था बदलण्यासाठी खर्ची घातले. समाज व्यवस्थेतील तळागाळातील शेवटचा घटक सुखी व्हावा, एकमेकांप्रति आदर निर्माण व्हावा, जातीय आणि सामाजिक सलोखा निर्माण व्हावी, अशीच विचारधारा गुरु रविदासांची असल्याचे प्रतिपादन डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी केले. श्रीगुरु संत शिरोमणी रविदास महाराज व वीर कक्कया महाराज यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे श्री गुरु संत रविदास महाराज व वीरशैव क्रांतीवीर कक्कया महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी

आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय चर्मकार संघाचे मराठवाडा उपाध्यक्ष एन. डी. शिंदे, राष्ट्रीय ढोर समाज संघटनेचे संस्थापक परशुराम इंगोले, विजयप्रकाश ठोंबरे, ज्ञानोबा कांबळे, बी. आर. शिंदे, विलासराव बडे, अंबादास वाघमारे, सौ. अनुसया साळुंखे, आशाबाई रामगुडे, नानासाहेब घोडके, सुनिल शिंदे, अनिल डोंगरे, ज्ञानोबा माने, बाळकृष्ण हंकारे, दिलीप बनसोडे, संतोष

◀◀ पान ३ वर

विज्ञानाच्या नवीन संकल्पनेतून विद्यार्थ्यांनी भरारी घ्यावी -कंगळे

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात दि २८ फेब्रुवारी शुक्रवार रोजी विज्ञान दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाची सुरुवात सी.व्ही.रमण,व पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमा पूजनाने झाली.या प्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे उपमुख्याध्यापक शैलेश कंगळे सर, प्रमुख अतिथि शिवानंद खुर्पे,विभाग प्रमुख रवींद्र

खोडवे,सदाशिव ढगे,अभ्यासपूरक मंडळ प्रमुख अपर्णा मुळे,इत्यादि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवानंद खुर्पे,या विद्यार्थ्यांने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.अध्यक्षीय

◀◀ पान ३ वर

तहसिलदारांचा खोरडेपणा कि खोटे बोलतात ? माहिती देण्यास काटकसरपणा दाखविला

वडवणी दोन टिपर पकडले; चौकशी करुन एक सोडले तहसिलदारांचा दावा

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी येथे काल दि.२७ रोजी एक खडीचे व एक मुरमाचे टिपर वाहतुक करत आसताना पकडले. तर खडी भरलेल्या टिपरची चौकशी करुन राँयल्टी भरलेली पावती होती यामुळे सोडून दिले तर दुसरे मुरुम भरलेले टिपर तहसिलच्या प्रंगणात उभा केले आहे. तर याबाबत माहिती घेण्यासाठी वडवणीचे तहसिलदार वैभव महेंद्रकर यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क केला आसता त्यांनी माहिती देण्यासाठी कटकसर केली आहे. टिपर कुठे पकडले ? सोडून दिलेले खडीच्या टिपरचा नंबर काय ? असे विचारल्यावर तहसिलदार यांना सांगता आले नाही. तर समोर भेट घेतल्या नंतर माहिती देणार नाही असा पवित्र घेत गौण खनिज अधिकारी यांना विचारा असा सल्ला दिला आहे.

काल वडवणी याठिकाणी खडीचे एक व मुरुम वाहतुक करणारे एक असे दोन टिपर पकडले आहेत. सदरील टिपर तहसिल प्रशासनाच्या ताब्यात होते. अशी माहिती मिळाली होती. यानंतर पत्रकार प्रतिनिधी यांनी माहिती घेण्यासाठी तहसिल कार्यालयात गेले. तहसिलदार यांची कॉबिन बंद दिसली तेव्हा नायब तहसिलदार जरांगे यांच्याशी भेट घेतली तेव्हा याविषयीची माहिती तहसिलदार साहेब यांच्याशी बोला असे सांगितले. तेव्हा तहसिलदार यांच्या कार्यलयाचे दार पुन्हा बंद दिसले. म्हणून भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधला तर ते म्हणाले कि, खडी भरलेले आणि मुरुमाची वाहतुक करणारे टिपर पकडले होते. यातील खडी भरलेले टिपरची राँयल्टी भरली होती म्हणून सदरील टिपर सोडून दिले आहे. यानंतर टिपर कोणी पकडले आणि कुठे पकडले ? अशी विचारणा केल्यानंतर कुठे पकडले हे सांगता आले नाही, सोडलेल्या

◀◀ पान ३ वर

मोरेवाडी साठवण तलावाच्या भूमिपूजन झाल्याशिवाय मोरेवाडीत येणार नाही हा शब्द मी पूर्ण केला - आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

मोरेवाडी साठवण तलावासाठी मी गेल्या दहा वर्षापासून प्रयत्न करत असून पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी मी एकट्याने प्रयत्न केला आणि प्रमाणपत्र मिळवल्यानंतर गेल्या दहा वर्षातील दोन लोकप्रतिनिर्धीनी याविषयी एक कागद हलवलेला नाही. त्यामुळे मी साठवण तलावाचे भूमिपूजन करण्यासाठीच गावात येईल असा मोरेवाडीकरांना दिलेला शब्द आज पूर्ण करत आहे.या साठवण तलावाच्या भूमिपूजनासाठी मोरेवाडी येथे आलो आहे.या तलावामुळे

परिसरातील शेतकऱ्यांना शेती सिंचनासाठी मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले.ते मृद व जलसंधारण विभाग बीड यांच्या अंतर्गत आष्टी तालुक्यातील मोरेवाडी साठवण तलाव भूमिपूजन समारंभ प्रसंगी ते मार्गदर्शन करताना बोलत होते. लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या शुभहस्ते साठवण तलाव कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

आ.धस बोलताना पुढे म्हणाले की,२०१४ पासून या तलावाच्या कामासाठी आपण होतो.त्याच काळात पाणी

◀◀ पान ३ वर

दिंद्रुडला पेट्रोल व प्रदुषण विरहित ई-बाईकच्या शोरूमचा शुभारंभ

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे प्रदूषण व पेट्रोल विरहित ही बाईक शोरूम चा शुभारंभ शुक्रवारी करण्यात आला. आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र राज्य प्रमुख डॉ ओमप्रकाश शेटे यांची प्रमुख उपस्थिती याप्रसंगी होती.

ई-बाइक मुळे पेट्रोलचा खर्च वाचणार आहे, केवळ सात ते दहा रुपयांमध्ये ६० ते १०० किलोमीटर दुचाकी प्रवास करता येणार आहे. सेंट्रल लॉकिंग सिस्टीम, जीपीएस, म्युझिक

◀◀ पान ३ वर

युसूफवडगांव येथे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती अतिशय धुमधडाक्यात व उत्साहात साजरा करण्यात आली.

सर्वप्रथम अगोदर कुळवाडी भुषण,बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वरूढ पुतळ्यास सरपंच महेश गायके,प्राचार्य अंकुश भोसले,जेष्ठ शिक्षक राजाभाऊ खरबड,उपसरपंच महेश लामतुरे व पं.स.सदस्य उमाकांत भुसारी, अशोक मोडवे, सचिन

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

‘दोघांमध्ये संमतीने संबंध, तरूणी स्वत:हून बसमध्ये चढली’-आरोपीच्या वकिलाचा दावा

पुणे । प्रतिनिधी

पुण्याच्या स्वारगेट बलात्कार प्रकरणी आरोपी दत्तात्रय रामदास गाडे (३७) अटक करण्यात आली असून त्याला पुणे कोर्टात हजर करण्यात आले. यावेळी दोन्ही बाजुची सुनावणी पार पडली व आरोपीला १२ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. दोघांमध्ये संमतीने शारीरिक संबंध असल्याचा दावा आरोपीच्या वकिलाने केला आहे. कोणताही प्रतिकार केला नाही, तरुणी स्वत:हुन बसमध्ये चढली, असाही दावा आरोपीच्या वकिलाने केला आहे. तर सरकारी वकिलांनी आरोपीवरील गुन्ह्यांची माहिती कोर्टात दिली आहे.

पिडीतेवर आरोपीने दोनवेळा बलात्कार केला. तसेच तिला आपण बसचा वाहक असल्याचे सांगीतले होते, अशी माहिती पोलिसांनी कोर्टात दिली असून १४ दिवसांची पोलिस कोठडीची

मागणी करण्यात आली आहे. तसेच आरोपीवर ६ गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. आरोपी दोन दिवसांपासून फरार होता. त्याच्या अटकेसाठी पुणे पोलिसांनी १३ विशेष पथके तयार केली होती. गुरुवारी रात्री उशिरा शिरूर तालुक्यातील एका गावातून त्याला अटक करण्यात आली. गाडेला आज (शुक्रवार) पुणे सत्र न्यायालयात हजर करण्यात आले, जिथे न्यायालयाने त्याला १२ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. आरोपीचे वकिलपत्र वाजिद खान बिडकर यांनी घेतले. पोलिसांनी न्यायालयात सादर केलेल्या माहितीप्रमाणे, आरोपीचा गुन्हेगारी इतिहास असून त्याच्यावर यापूर्वीही चोरी, दरोडा, चेन स्नॅचिंग यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याने पीडितेवर दोन वेळा अत्याचार केलेत. मित्राच्या सूचनेनंतर पीडितेने तक्रार दाखल केली.

स्वारगेट बस स्थानक हे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (चडळढउ) चे सर्वात मोठे बस डिपोंपैकी एक आहे. मंगळवारी (दि. २५) सकाळी साडेपाचच्या सुमारास पीडित महिला फलटण येथे जाण्यासाठी बसची वाट पाहत होती. त्यावेळी आरोपीने तिच्याशी संवाद साधला आणि सताऱ्याची बस दुसऱ्या स्टँडवर उभी आहे, असे सांगून तिला दिशाभूल केली. त्यानंतर, आरोपीने पीडितेला स्थानकातील रिकामी उभी असलेल्या शिवशाही एसी बसमध्ये नेले. बसच्या आतील दिवे बंद होते, त्यामुळे पीडितेला संशय आला. मात्र, आरोपीने तिला विश्वास दिला की हीच योग्य बस आहे. त्यानंतर आरोपीने जबरदस्ती करून तिच्यावर बलात्कार केला.

उसाने भरलेली ट्रॉली मोटारीवर उलटली; सुदैवाने दोघे बचावले

नारायणगाव । प्रतिनिधी

पुणे-नाशिक महामार्गावरील नारायणगाव (ता. खेड) बाह्यवळण रस्त्यावर ऊस वाहतूक करणारी ट्रॅक्टर ट्रॉली मोटारीवर उलटली. यात केवळ नशीब बलवत्तर म्हणून मोटारीतील दोघांचा जीव वाचला आहे. गुरुवारी (ता. २७) दुपारी ही घटना घडली. दरम्यान, या घटनेमुळे ट्रॅक्टरला दोन ट्रॉली जोडून होणाऱ्या धोकादायक ऊस वाहतुकीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

शिंगवे (ता. आंबेगाव) येथील योगेश वाव्हळ व संतोष कोल्हे हे आज सकाळी नारायणगाव येथे दातांच्या उपचारासाठी आले होते. दुपारी दोनच्या सुमारास नारायणवाडी येथील बाह्यवळण रस्त्याने ते मोटारीने मंचरच्या दिशेने निघाले होते. त्यांच्यापुढे ५० ते ६० फूट अंतरावर दोन ट्रॉली जोडलेला ट्रॅक्टर मंचरच्या दिशेने ऊस घेऊन निघाला होता.

प्रत्येक ट्रॉलीत सुमारे १० टन ऊस होता. दरम्यान दोन ट्रॉलींना जोडलेला सुकाणू तुटल्यामुळे व ओव्हरलोडमुळे उसाने भरलेल्या ट्रॉली उलट मागच्या दिशेने येऊ लागल्या. हे पाहताच

वाव्हळ यांनी प्रसंगावधान राखून ट्रॉलीच्या मागे असलेली मोटार मागे घेण्याचा प्रयत्न केला.

सुमारे २० फूट मागे गेल्यानंतर मागून दुसरी बस व दोन ते तीन दुचाकी येत असल्याने अपघात टाळण्यासाठी वाव्हळ यांनी मोटार थांबवली. दरम्यान, मागच्या दिशेने येत असलेल्या ट्रॉलींपैकी एक मोटारीवर उलटली. सुमारे १० टन ऊस मोटारीवर पडल्यामुळे मोटारीचे नुकसान झाले. सुदैवाने वाव्हळ व कोल्हे यांचा जीव बचावला. स्थानिक नागरिकांनी त्यांना बाहेर काढले. त्यानंतर वाहतूक पोलिस घटनास्थळी दाखल झाले.सध्या ऊस तोडणी हंगाम सुरू आहे. ट्रॅक्टरला जोडलेल्या दोन ट्रॉलींद्वारे उसाची पुणे-नाशिक महामार्गावरून धोकादायक पद्धतीने वाहतूक सुरू आहे. ऊस भरलेल्या ट्रॉलींमुळे यापूर्वी अपघाताच्या अनेक घटना घडल्या आहेत. मात्र, वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवून वाहतूक खर्च वाचविण्यासाठी दोन ट्रॉलींद्वारे सुमारे २० टन उसाची वाहतूक केली जाते.

खेड खरेदी-विक्री संघाचे ९ संचालक बिनविरोध

खेड । प्रतिनिधी

तालुक्याच्या सहकार चळवळीचा मुख्य कणा असलेल्या खेड तालुका खरेदी-विक्री संघाचे ९ संचालक बिनविरोध निवडून आले. उर्वरित ९ जागांसाठी १७ उमेदवार रिंगणात आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापना असलेल्या या संस्थेची पहिल्यांदा निवडणूक होत असल्याचे मानले जात आहे.

मोजके सभासद असतानाही अनेक सभासद निवडणुकीत उतरल्याने नेतेमंडळींना कसरत करावी लागली. मात्र, तरीही समन्वय साधता आला नाही. असे असले, तरी काही महिन्यांपूर्वी पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत झालेला जय-पराजय संघाच्या बिनविरोध निवडीला बाधक ठरला, असे मानले जात आहे.

खरेदी-विक्री संघाच्या संचालक मंडळातील १८

जागांसाठी ५३ उमेदवारांनी ५९ अर्ज दाखल केले होते. माघारीच्या अखेरीस म्हणजे गुरुवारी (दि. २७) ३६ जणांनी माघार घेतली. प्रोसेसिंग व कंझ्युमर्स प्रतिनिधी गटातून हिरामण सातकर, सोसायटी अ गटातल्या आळंदी गटातून स्वामी येळवंडे, खेड गटातून खंडेराव थिगळे, वाडा गटातून अरुण सोमवंशी बिनविरोध निवडून आले आहेत. उर्वरित ५ गटांत दिग्गज उमेदवारांमध्ये चुरशीची लढत होणार आहे.

महिला प्रवर्गातून तिन्हेवाडीच्या सरपंच प्रतीक्षा पाचारणे आणि पूजा कचाटे, अनुसूचित जाती-जमातीमधून कल्याणशील देखणे, इतर मागास प्रवर्गमधून दत्तात्रय सातपुते, सोसायटी बिगरशेती गटातून मुकुंद धायबर हे बिनविरोध निवडून आले. त्यांच्या समर्थकांनी जल्लोष करीत विजयाचा आनंद व्यक्त केला.आमदार बाबाजी काळे, संघाचे मावळते अध्यक्ष राजाराम लोखंडे, हिरामण सातकर, बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील, माजी सभापती कैलास लिंभोरे, कैलासराव सांडभोर, अमोल पवार, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अनिलबाबा राक्षे, राजूशेठ जवळेकर, मयूर मोहिते पाटील, शांताराम भोसले, विलास कातोरे, खंडेराव थिगळे, विनायक घुमटकर, संजय घनवट, एकनाथ सांडभोर, सोमनाथ मुंगसे, डॉ. गणेश पोखरकर, मारुती सातकर, उपसरपंच रंगनाथ आरूडे आदींसह तालुक्यातील नागरिक माघारी दरम्यान सहायक निबंधक सहकारी संस्थेच्या कार्यालयात उपस्थित होते.आपापले उमेदवार बिनविरोध व्हावेत यासाठी जोरदार फिल्डिंग लावण्यात आली होती. त्याला काही प्रमाणात प्रतिसाद मिळाला. मात्र, ९ जागांसाठी अनेक उमेदवार अडून बसले आणि निवडणूक लागली. शुक्रवारी (दि. २८) चिन्हवाटप होणार असून, ९ मार्चला मतदान होणार आहे.

मोशीतील मानाच्या विड्याची बोली लागली तब्बल २५ लाख रुपयांना

मोशी । प्रतिनिधी

संपूर्ण महाराष्ट्रात मानाच्या विड्याच्या लिलावासाठी लाखोंची बोली लावण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या श्री नागेश्वर महाराज भंडारा उत्सवातील लिलावामध्ये या वर्षीच्या मानाच्या विड्याला तब्बल २५ लाख रुपयांची बोली लावली गेली. हा विडा मोशीतील जगदीश श्रीपती जाधव-सस्ते यांनी घेतला.

श्री नागेश्वर महाराज यांचा आशिर्वादच जणू आपणास मिळाला आणि या आशिर्वादानेच आपले कुटुंब व मोशी ग्रामस्थ सुखी आहेत. त्यामुळेच आपण हा विडा घेतला असल्याची प्रतिक्रीया यावेळी जगदीश श्रीपती जाधव-सस्ते यांनी दिली. तर मानाची ओटी रोहीदास विष्णू घिगे (हवालदार) १७ लाख५२ हजार, आकाश विष्णू सस्ते मानाचे शेवटचे लिंबू ११ लाख १ हजार १०१, लिलावाची सुरुवात ज्या विड्याने झाली तो मानाचा पहिला विडा भालचंद्र बोराटे

७ लाख ५१ हजार रूपये, पहिले लिंबू संभाजी बबन बोऱ्हाडे १ लाख ७१ हजार रूपयांना घेतले.

देवाच्या दारात पैशाला मोल नाही हेच खरं, याचा प्रत्यय करून देणारा हा लिलाव आहे. त्या लिलावात सुरुवातीपासून शेवटपर्यंत बसणाऱ्याला हे हमखास जाणवतं. ‘नागेश्वर महाराजांच्या सानिध्यातील वस्तू, प्रसाद घेईल त्याला भरभरात’ या अशा शब्दात व भारदस्त आवाजात उत्सवातील लिलावात पुकार करण्याचे काम केदारी कुटुंबातील नारायण निवृत्ती केदारी, सागर नारायण केदारी हे करत होते.

सकाळी दहा वाजल्यापासून शेकडो ग्रामस्थांच्या उपस्थितीत मोशीतील ग्रामदैवत श्री नागेश्वर महाराज मंदीर येथे भंडाऱ्यातील विविध वस्तूंचा लिलाव सुरु होता. सकाळी दहा ते पाच वाजेपर्यंत हा लिलाव सुरु होता. सुमारे १ कोटी ४६ लाख रूपयांचा लिलाव करण्यात आला.

दरवर्षी या लिलावामध्ये भाविकांना अर्पण केलेल्या सोन्या चांदीच्या वस्तूंचा व भंडाऱ्यातील प्रसाद व लिंबू अशा वस्तूंची बोली लावून लिलाव केला जातो. ग्रामस्थांकडून भंडाऱ्यातील महाप्रसाद बनविण्याची भांडी दरवर्षी नव्याने खरेदी केली जातात. मानाची ओटी आणि मानाचे लिंबू हे लिलावातील महत्ताचे मानले जाते.

केदारी यांचा यंदा ग्रामस्थांच्यावतीने उभा पोशाख, शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. उत्सवातील वस्तूंचा लिलाव हा पंचक्रोशीतील भाविकांच्या दृष्टीने एक विशेष पर्वणीचा सण असतो.त्यामुळे लिलाव पाहण्यासाठी सभा मंडपामध्ये भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. आता यंदादेखील या मानाच्या विड्याची पंचक्रोशीत चर्चा सुरू झाली आहे.

बिबट्याच्या हल्ल्यात एकजण जखमी

नारायणगाव । प्रतिनिधी

हिवरे तर्फे नारायणगावच्या भोरमळा येथील किसन लक्ष्मण भोर (वय ५४) यांच्यावर बिबट्याने हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले. ही घटना शुक्रवारी (दि. २८) सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास घडली. जखमी भोर यांना तातडीने नारायणगाव येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, किसन भोर हे जनावरांना चारा आणण्यासाठी बाजूच्या शेतात जात असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक त्यांच्यावर हल्ला केला. त्यांना शेतात ओढून नेत असताना बाजूच्या शेतात काम करीत असलेल्या शेतकऱ्यांनी आरडा-ओरडा केल्याने बिबट्याने भोर यांना सोडून बाजूच्या उसात धूम ठोकली.

दरम्यान, बिबट्याच्या दाताची जखम भोर यांच्या पायाला खोलवर झाली आहे. बाजूच्या इतर शेतकऱ्यांनी त्यांना तातडीने नारायणगाव येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले. बिबट्याच्या हल्ल्याची माहिती वनविभागाला मिळताच वन विभागाचे वनक्षेत्रपाल प्रदीप चव्हाण व त्यांचे सहकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळी तातडीने पिंजरा लावण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

बिबट्याचे मानवावर हल्ले वाढू लागल्याने बिबट्याचा बंदोबस्त कायम स्वरूपी करावा, अशी मागणी मनसेचे जिल्हा प्रमुख मकरंद पाटे यांनी केली आहे. वन खात्याने तातडीने बिबट्यांना पकडण्याचे नियोजन करावे, अन्यथा आंदोलन करावे लागेल. असा इशारा त्यांनी दिला आहे.

महसूल सहाय्यक महिलेला लाच घेताना अटक; शेतकऱ्याकडे मागितली होती २५ हजाराची लाच

इंदापूर । प्रतिनिधी

इंदापूर तहसील कार्यालय येथे महसूल सहाय्यक म्हणून कार्यरत असलेल्या कावेरी विजय खाडे यांना शेतकऱ्याकडून २५ हजाराची लाच घेतल्याप्रकरणी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेत गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक प्रेम वाघमारे यांनी दिलेल्या माहितीनुसार इंदापूर तालुक्यातील तक्रारदार यांच्या वडिलांची ३९ गुंठे जमीन आहे. त्या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता नव्हता. त्याबाबत सन २०२० पासून तहसीलदार यांच्याकडे दावा सुरू आहे. याबाबत तहसीलदार इंदापूर यांची सुनावणी होऊन निकाल देणे बाबतची प्रक्रिया बाकी होती.

सदर निकालाची कागदपत्रे तक्रारदाराच्या बाजूने तयार करून द्यावे म्हणून कावेरी विजय खाडे (वय-४८ वर्षे) महसूल सहाय्यक वर्ग ३ तहसील कार्यालय इंदापूर, रा. संघवीनगर, भिगवन रोड, बारामती) यांनी ५० हजार रुपयाची लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती २५ हजार रुपये देण्याचे ठरले.

त्याबाबत संबंधित शेतकऱ्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती. त्यानुरूप शुक्रवार (ता. २८) रोजी ५ वाजताच्या दरम्यान सापळा रचून संबंधित महसूल सहाय्यक कावेरी खाडे यांना २५ हजाराची लाच स्वीकारताना ताब्यात घेण्यात आले.

महाशिवरात्री निमित्त वाघेश्वर मंदिरात भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी

वाघोली । प्रतिनिधी

वाघोली येथे महाशिवरात्री निमित्त वाघेश्वर मंदिरात मध्यरात्री पासूनच हजारोंच्या संख्येने भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. दिवसभर अबाल वृद्धांनी वाघेश्वर मंदिराचा परिसर भक्तिमय वातावरणात गजबजून गेला होता. वाघोली गावठाण येथील महादेव मंदिरामध्ये देखील दिवसभर दर्शनासाठी नागरिकांची गर्दी झाली होती.

वाघोली येथील वाघेश्वर मंदिर हे पुरातनकालीन आहे. महाशिवरात्रीला वाघोली व परिसरातून भाविक मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी येतात. दरवर्षी प्रमाणे महाशिवरात्री निमित्त अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन केले होते. सप्ताहादरम्यान दररोज कीर्तन व

भाविकांना अन्नदान केले गेले. महाशिवरात्री संगीत पहाट कार्यक्रमाचे आयोजनही केले गेले होते. महाशिवरात्री निमित्त मंदिर परिसरामध्ये फूल, खेळणी, प्रसादाची दुकाने थाटल्याने यात्रेचे स्वरूप आले होते. दरवर्षीप्रमाणे मंदिर परिसरात आकर्षक रोषणाई, फुलांची सजावट यावेळी करण्यात आली होती. मंदिरासमोरील मंडपामध्ये हरिनामाचा जाप व भजन-किर्तन दिवसभर सादर करण्यात आले. वाघोली पोलिस व वाघोली विकास प्रतिष्ठाणच्या वतीने भाविकांना दर्शन सुरळीत घेता यावे यासाठी चोख सुरक्षा व्यवस्था करण्यात आली होती. सामाजिक संघटना व दानशूर व्यक्तींच्या वतीने भाविकांना लस्सी, केळी, फराळ, पाणी बॉटलचे वाटप केले गेले.

इस्त्राईलचे कौन्सिल जनरल कोब्बी शोषानी यांना ‘सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार २०२५’ प्रदान; परराष्ट्र व्यवहार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सन्मान

पुणे । प्रतिनिधी

इस्राईल आणि भारत यांच्यातील परस्पर संबंध अधिक सक्षम होण्यात, परराष्ट्र क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल इस्राईलचे भारतातील कॉन्सुल जनरल कोब्बी शोषानी यांना सुर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या वतीने ‘सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार २०२५’ प्रदान करण्यात आला. पुण्यातील जेडब्ल्यू मेरियट हॉटेलमध्ये आयोजित एका शानदार सोहळ्यात ज्येष्ठ अभिनेते रझा मुराद व ‘सूर्यदत्त’चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या हस्ते शोषानी यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी संस्थेच्या उपाध्यक्ष व सचिव सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, कार्यकारी विकास अधिकारी सिद्धांत चोरडिया, मुख्य कार्यपालन अधिकारी अक्षित कुशल, महाव्यवस्थापक रोहित संचेती, वर्ल्ड ट्रेड सेंटरचे व्यवस्थापकीय संचालक सागर चोरडिया आदी उपस्थित होते. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, विद्यार्थ्यांना प्रेरक आणि विविध क्षेत्रातील आदर्श व्यक्तीमत्वांचा सन्मान करून त्यांच्या सेवेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा सोहळा असतो.आपल्यासारख्या महान व्यक्तींचे कार्य विद्यार्थ्यांसाठी दीपस्तंभासारखे असते.

त्यातून विद्यार्थ्यांना त्यांची स्वप्ने आणि आकांक्षा पूर्ण करण्यास प्रोत्साहन मिळते. समाजातील दिग्गजांच्या गौरवाचा हा सोहळा सूर्यदत परिवारासाठी अविस्मरणीय क्षण असतो. कोब्बी शोषानी यांनी परराष्ट्र क्षेत्रात दिलेले योगदान अतुलनीय आहे. त्यांच्या धोरणी आणि मुत्सद्दी कार्यामुळे भारत आणि इस्राईल या दोन्ही देशांतील परस्पर सबंध अधिक मजबूत होत आहेत. हा पुरस्कार स्वीकारताना आनंद होत असल्याचे सांगून कोब्बी शोषानी म्हणाले, काटेकोर शिस्त आणि समर्पित वृत्ती ही इस्राईलची ओळख असून, त्या देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मला मिळतेय, याचा मला अभिमान वाटतो. मला भारताविषयी अतीव प्रेम आहे. वर्षागणिक या सुंदर अशा देशाची संस्कृती आणि येथील लोकांविषयी माझ्या मनात आदर, प्रेम व आस्था वाढत आहे. विद्यार्थ्यांना प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी सूर्यदत्त मोलाचे योगदान देत आहे. विद्यार्थ्यांच्या क्षमता वाढवण्यासाठी संस्थेत राबविण्यात येत असलेले उपक्रम महत्वपूर्ण आहेत. ज्ञानाचा मार्ग सहकार्याचा असतो, आणि या ज्ञानमार्गात सहभागी होण्यास मी उत्सुक आहे, असे त्यांनी नमूद केले.

रझा मुराद यांनी कोब्बी शोषाणी यांच्याबद्दल आदर व्यक्त केला. इस्रायल आणि भारत यांच्यातील संबंध मजबूत करण्यासाठी त्यांचे अमूल्य योगदान आहे. अशा व्यक्तीला सन्मानित करताना मला उपस्थित राहता आल्याचा आनंद आहे. शोषाणी यांचा सन्मान म्हणजे दोन महान राष्ट्रांमधील दृढ संबंध साजरे करण्यासारखे आहे. २०१४ पासून सूर्यदत्त संस्थेशी संबंधित असल्याचा मला खूप अभिमान आहे, आणि मी या नात्याला अजूनही मोठा मान देतो आणि भविष्यात अनेक वर्षे या अद्भुत परंपरेचा भाग होण्याची मला इच्छा आहे, असे रझा मुराद यांनी नमूद केले. सागर चोरडिया यांनी सांगितले, ‘माननीय कोब्बी शोषाणी यांचे इस्राईलचे कॉन्सुल जनरल म्हणून कार्य अत्यंत आदर्शवत आहे. त्यांची समर्पण आणि राजनैतिक कौशल्ये दीर्घकालिक प्रभाव निर्माण करणारी आहेत, आणि मला विश्वास आहे की हे पुरस्कार त्यांच्याशी संबंधित त्यांच्या प्रयत्नांचे योग्य मान्यता आहे. सर्वांना उत्कृष्टतेसाठी प्रयत्नशील होण्याची प्रेरणा देणाऱ्या अशा प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्वांचा सन्मान केल्याबद्दल सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे अभिनंदन करतो.

स्नेहल नवलखा यांनी शोषानी यांना सूर्यदत्त संस्थेमध्ये येण्याचे, तसेच विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याचे निमंत्रण दिले. शोषानी यांनी त्याला सकारात्मक प्रतिसाद देत आपल्याला संस्थेत येऊन विद्यार्थ्यांशी बोलायला आणि माझे अनुभव शेअर करायला आवडेल, असे आश्वस्त केले.

महामार्ग होणार सोमवारपासून मोकळे; अतिक्रमण हटविण्यासाठी प्राधिकरणाकडून ३० दिवसांचे वेळापत्रक

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहराभोवती असलेल्या राष्ट्रीय महामार्ग व राज्य मार्गाच्या दोन्ही बाजूस असलेले अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचे वेळापत्रक पुणे महानगर क्षेत्र प्राधिकरणाकडून तयार करण्यात आले आहे. त्यानुसार सर्व विभागांशी समन्वय साधून पुढील तीस दिवसांत ही कारवाई सुरू ठेवून महामार्ग मोकळे करण्यात येणार आहेत. त्यांची सुरुवात तीन मार्चपासून करण्यात येणार आहे. पुणे शहराभोवती दिवसेंदिवस वाहतूक कोंडी वाढत असल्याने वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागतो. त्यावर तोडगा काढण्यासाठी महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांच्या अध्यक्षतेखाली आज विविध यंत्रणेच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक झाली. त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला. पुणे शहराभोवती असणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग आणि राज्यमार्गावर होणारी वाहतूक कोंडीबाबत विविध विभागांनी बैठकीत मते नोंदविली.



त्यानुसार या महामार्गांवर वाहतूक कोंडी होणाऱ्या विविध भागांत पुढील ३० दिवसांत राष्ट्रीय महामार्ग व राज्यमार्गाच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूस अनधिकृत व अतिक्रमण केलेली दुकाने, गाळे, बांधकामे व इतर काही तात्पुरत्या स्वरूपाच्या बांधकामांवर सर्व विभागांनी संयुक्तपणे कारवाई करण्याचे निश्चित करण्यात आले. यापुढील काळात वर्षातून दोन वेळा अशा प्रकाराच्या कारवाईचे नियोजन आहे. त्यामुळे नागरिकांनी परवानगी घेऊन बांधकामे करावीत, असे आवाहन डॉ. योगेश म्हसे यांनी केले आहे. या बैठकीस अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील, सहआयुक्त दीप्ती सूर्यवंशी-पाटील, अधीक्षक भूमी अभिलेखाच्या आशा जाधव, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण प्रकल्प संचालक संजय कदम, पिंपरी चिंचवड मनपाचे शहर अभियंता मकरंद निकम, वाहतूक विभागाचे उपआयुक्त बापू बांगर, पुणे शहर सहाय्यक पोलिस आयुक्त नंदिनी वग्याणी, पोलिस निरीक्षक महेशकुमार सरतापे, शंकर पाटील, मीनल पाटील, संतोष जाधव, बी. के. गायकवाड, पिंपरी चिंचवड मनपाचे सह शहर अभियंता हरियाल नरेश, एमआयडीसीचे उपअभियंता प्रकाश पवार, पुणे मनपाचे उप अभियंता महेश पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कल्पेश लहिवाल, एमआयडीसीचे एम. एस. भिंगारदिवे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.